ठाणे, मंगळवार दि. ७ मे २०२४ | वर्ष : १३, अंक : ०९, पाने : ४, किंमत : २ रुपये | Maharashtra Samrat | Maharashtra Samrat | dainikmahasamrat@gmail.com | Reg. No. THC/58/2024-2026



दैनिक लोकसभेचा संग्राम

# महाराष्ट्र सम्राट

सम्राट अनेक परंतु बातम्यांचा एकच ! ®

मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, नवी मुंबई, रायगड, पालघर आणि पुणे येथून प्रसिद्ध

संपादक : चंद्रकांत भोईटे




**तापमान**

कमाल ४१° से | किमान २८° से

**बाजार**

सोने ७१,०१० | चांदी ८१,८६०

**डोकं खाजवा** –अशोक सुतार



**तुला अतृप्त आत्मे पाहण्याचे खूळ लागलं आहे. ते पहायचे असतील तर निवडणुकीच्या प्रचारसभेत भेटतील.**

# आज तिसऱ्या टप्प्यातील मतदान

## कोणाची, कोणाशी लढत ?

**मुंबई – राज्यात तिसऱ्या टप्प्यात उद्या ११ मतदारसंघांमध्ये मतदान होत असतानाच, महायुतीला गेल्या वेळी जिंकलेल्या सात तर महाविकास आघाडीला चार जागा कायम राखण्याचे आव्हान असेल. बारामती, माढा, रायगड, रत्नागिरी–सिंधुदुर्ग या मतदासंघांतील लढती चुरशीच्या झाल्या आहेत. तिसऱ्या टप्प्यात मतदान होत असलेल्या रायगड, लातूर, सोलापूर, माढा, सांगली, कोल्हापूर आणि हातकणंगले या सात जागा सध्या महायुतीकडे आहेत. बारामती, उस्मानाबाद, सातारा, रत्नागिरी–सिंधुदुर्ग हे चार मतदारसंघ महाविकास आघाडीकडे आहेत. महायुतीसाठी उद्याची लढत अधिक आव्हानात्मक आहे.**



■ बारामतीमध्ये सुप्रिया सुळे आणि सुनेत्रा पवार या नणंद–भावजयीमधील लढतीकडे साऱ्या राज्याचे लक्ष लागले आहे. हा मतदारसंघ कायम राखणे हे शरद पवार यांच्यासाठी जसे प्रतिष्ठेचे आहे तसेच अजित पवार यांच्यासाठी आव्हानात्मक आहे. बारामतीच्या निकालावर अजित पवार यांचे महत्त्व ठरणार आहे. यामुळेच गेली १५ दिवस अजित पवार हे बारामीतमध्ये ठाण मांडून बसले होते.

■ रत्नागिरी–सिंधुदुर्गमध्ये केंद्रीय मंत्री नारायण राणे यांची प्रतिष्ठा पणाला लागली आहे. भाजपने राज्यसभेची उमेदवारी नाकारून त्यांना लोकसभेसाठी उभे केले आहे. निकाल विरोधात गेल्यास राणे यांच्या भविष्यातील राजकारणावर परिणाम होऊ शकतो. राणे यांच्यासाठी ही लढत म्हणजे अस्तित्वाची लढाई आहे. राणे यांनी विजय संपादन केल्यास कोकणात शिवसेना ठाकरे गटाला मोठा हादरा बसू शकतो. यामुळेच राणे आणि ठाकरे गटाने सारी ताकद या मतदारसंघात पणाला लावली आहे.

■ रायगडमध्ये सुनील तटकरे यांच्यासाठी ही लढत महत्त्वाची आहे. राष्ट्रवादीतील फुटीनंतर अजित पवार गटाचे प्रदेशाध्यक्षपद भूषविणारे तटकरे यांच्यासमोर ठाकरे गटाचे अनंत गीते यांचे मोठे आव्हान आहे. तटकरे आणि गीते यांच्यात ही तिसरी लढत आहे. यापूर्वी उभयतांनी प्रत्येकी एकदा विजय प्राप्त केला होता. तिसऱ्यांदा कोण बाजी मारतो याची उत्सुकता असेल.

■ साताऱ्यात छत्रपती शिवाजी महाराजांचे थेट वंशज उदयनराजे भोसले यांचीही कसोटी आहे. कारण सातारा मतदारसंघ गेली २५ वर्षे राष्ट्रवादीच्या ताब्यात आहे. गेल्या वेळी राजीनामा दिल्यावर झालेल्या पोटविवडणुकीत उदयनराजे यांचा पराभव झाला होता. यंदा राष्ट्रवादी शरद पवार गटाचे शशिकांत शिंदे यांचे कडवे आव्हान उदयनराजे यांच्यासमोर आहे.

■ कोल्हापूरमध्ये काँग्रेसच्यावतीने लढणारे छत्रपती शाहू महाराज यांची प्रतिष्ठा पणाला लागली आहे. महायुतीने राजा विरुद्ध प्रजा असा रंग देण्याचा प्रयत्न केला आहे. सातार आणि कोल्हापूरमधील लढत या दोन छत्रपती रिंगणात असल्याने चुरशीच्या झाल्या आहेत.

■ माढा मतदारसंघात विजयसिंह मोहिते–पाटील यांच्या कुटुंबियाने भाजपच्या विरोधात बंडखोरी केल्याने चर्चेत आली आहे. भाजपला आधी सोपी वाटणारी ही लढत शेवटच्या टप्प्यात अवघड झाली आहे.

■ सोलापूरमध्ये काँग्रेसच्या प्रणिती शिंदे आणि भाजपचे राम सातपुते यांच्यात चुरशीची लढत होत आहे. लागोपाठ दोन पराभवांचा बदला घेण्यासाठी सुशीलकुमार शिंदे यांची कन्या प्रणिती शिंदे या रिंगणात उतरल्या आहेत.

■ लातूरमध्ये भाजप आणि काँग्रेसमधील लढतती ही जागा कायम राखण्याचे भाजपपुढे मोठे आव्हान असेल.

■ सांगलीतील लढत कमीलीची चुरशीची झाली आहे. भाजपचे संजय पाटील, अपक्ष विशाल पाटील आणि शिवसेना ठाकरे गटाचे चंद्रहार पाटील यांच्यातील तिरंगी लढतीत कोण बाजी मारतो याकडे साऱ्यांचे लक्ष लागले आहे.

## राजन विचारे पैसे द्यायचा नाही, ना वडापाव खाऊ घालायचा

# पण माझ्या सांगण्यावर कार्यकर्ते काम करायचे: एकनाथ शिंदे



ठाणे: आजपर्यंत ठाणे लोकसभा मतदारसंघात राजन विचारे हा सामान्य कार्यकर्त्यांमुळे निवडून यायचा. यामध्ये राजन विचारेंचं कर्तृत्व काय होतं? खासदारकीला मोदी साहेबांच्या नावावर तुम्हाला मतं मिळाली, असे वक्तव्य मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले. ते सोमवारी ठाण्यातील महायुतीचे उमेदवार नरेश म्हस्के यांच्या प्रचारसभेत बोलत होते. यावेळी एकनाथ शिंदे यांनी ठाकरे गटाचे उमेदवार आणि विद्यमान खासदार राजन विचारे यांच्यावर टीकास्त्र डागले. निवडणुकीच्या काळात राजन विचारे कार्यकर्त्यांना पैसे द्यायचा नाही ना वडापाव खाऊ घालायचा. तरीही मी सांगायचो म्हणून सगळे काम करायचे. आता राजनचा सीझन संपला, नरेशचा विजय आता पक्का आहे. पण संजय केळकरांची विनंती आहे की, नरेश तुला थोडं बदलावं लागेल, असे शिंदे यांनी म्हटले. ज्यांना तिकीट मिळालं नाही त्यांनी चिंता करु नका. मला काही जणांना तिकडे पाठवायचे आहे, काहीजणांना इकडे ठेवायचे आहे, असेही शिंदे यांनी सांगितले.

### मुख्यमंत्र्यांच्या नरेश म्हस्केंना कानपिचक्या भाजप नेत्यांना दिलासा देण्याचा प्रयत्न (सविस्तर वृत्त पान २)

### उद्धव ठाकरे मला आनंद दिघेंवर सिनेमा काढून देत नव्हते: एकनाथ शिंदे

आनंद दिघे यांचे निधन झाल्यानंतर मी उद्धव ठाकरे यांना भेटायला गेलो तेव्हा त्यांचा पहिला प्रश्न होता की, दिघे यांची प्रॉपर्टी कुठे कुठे आहे? ते ऐकून मला वाटलं की, आपण चुकीच्या जागी आलो. उद्धव ठाकरे मला दिघे साहेबांचा सिनेमाही काढून देत नव्हते. बाळासाहेब ठाकरे यांचा सिनेमा निघाल्यानंतर दिघे साहेबांचा सिनेमा काढला म्हणून वेळ लागला. त्यातही अर्धा सिनेमा पाहून उद्धव ठाकरे निघून गेले. आता पार्ट २ येतोय, आता कळेल जे काय खरं खरं आहे ते या सिनेमामध्ये दिसेल, असे एकनाथ शिंदे यांनी सांगितले.

### मुख्यमंत्र्यांचे आनंद दिघेंबाबत मोठे वक्तव्य, रुग्णालयात असताना पद सोडायला सांगितल्याने दिघे बैचेन होते..

(सविस्तर वृत्त पान २)

### एकनाथ शिंदेंचा नगरसेवकांना इशारा

या सभेत एकनाथ शिंदे यांनी आपल्या नगरसेवकांना आणि कार्यकर्त्यांना एक महत्त्वाचा इशारा आणि काही सूचना दिल्या. २० तारखेपर्यंत कोणीही सुट्टी घेऊ नका. मोदीजींनी एकही सुट्टी घेतली नाही. एकनाथ शिंदेही एक दिवसही सुट्टी घेत नाही. घराघरात जा आणि लोकांना मतदान करायला सांगा. सकाळी सकाळी जाऊन लोकांना भेटा. सुट्टीत गावी जाणाऱ्या लोकांना मतदान करायला सांगा. मतदार बाहेर गेले असतील तर त्यांना इकडे आणण्याची प्रक्रिया आपण करु. नगरसेवकांची ही ट्रायल निवडणूक आहे. काम केलं तर तिकीट नाहीतर मग?, असे एकनाथ शिंदे यांनी म्हटले.



## धर्मवीर सिनेमाचे दिग्दर्शक तुम्हीच मग प्रसंग खोटे कसे?

ठाणे – धर्मवीर सिनेमाचे दिग्दर्शक तुम्हीच होता त्यातले प्रसंग तुम्हीच दाखवले मग हे प्रसंग खोटे कसे असा सवाल उपस्थित करीत महाविकास आघाडीचे शिवसेना ( उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे उमेदवार राजन विचारे यांनी मुख्यमंत्र्याच्या टीकेला प्रतिउत्तर दिले आहे. चित्रपट प्रदर्शित झाल्यानंतर २ वर्षानंतर त्यांना आपण खोटं दाखवले असल्याची कबुली देतात याचा अर्थ तुम्ही जनतेला खोटा सिनेमा दाखविला असल्याचा आरोप विचारे यांनी केला. **(पान २ वर)**

### यांनी केवळ सेटिंगचे राजकारण केले

शिंदे यांनी पहिले आमदराकीचे तिकीट मीच मिळवून दिले. आता मुख्यमंत्री म्हणून त्यांनी ठाण्यासाठी काय काय केले त्याची उत्तरे आधी द्या असा सवालही त्यांनी केला. तुम्ही तुमच्या स्वार्थासाठी शिवसेना तोडली, काँग्रेस, राष्ट्रवादी फोडली. केवळ सेटींगचेच राजकारण तुम्ही आतापर्यंत करीत आला आहेत. तसेच आता महाराष्ट्राची आणि ठाण्याची जनता तुमचा तमाशा बंद केल्याशिवाय राहणार नसल्याचा विश्वास विचारे यांनी यावेळी व्यक्त केला.

### गोल्डन गँगचा लीडर म्हणून म्हस्के प्रसिद्ध

नरेश म्हस्के कोरोना काळात कुठे होता, घरात बसून होता, महापौर पदाच्या कारकींद काय काम केले हे सांगावे, केवळ गोल्डन गँगचा लिडर म्हणूनच त्याची आतापर्यंत प्रसिद्धी राहिली आहे. ठाणे महापालिका लुटण्याचे काम मिंधे आणि म्हस्के याने केले. धर्मवीर आनंद दिघे यांच्या आनंद आश्रमाची पाटी काढून तेथे स्वत:च्या नावाची पाटी लावली त्यामुळे तुमच्या मनात दिघे यांच्यावरील प्रेम काय आहे हे जनतेला माहित आहे.

**थोडक्यात घडामोडी**

### ठाण्यातील रेहान सिंग बारावीच्या आयएससी बोर्डात भारतात पहिला

ठाणे – बारावीच्या आयएससी बोर्डाचा निकाल जाहीर झाला असून त्यात ठाणे येथील सुलोचनादेवी सिंघानिया शाळेतील मानव्यविद्या शाखेचा विद्यार्थी रेहान सिंग संपूर्ण भारतातून पहिला आला आहे.



त्याला ९९.७५% (३९९/४००) गुण मिळाले आहेत. आपल्या यशाबद्दल प्रतिक्रिया व्यक्त करताना रेहान म्हणाला की, माझे आई–वडील, आणि माझ्या शिक्षकांच्या मार्गदर्शनामुळे हे यश प्राप्त झाले आहे. मला साहित्य, आंतरराष्ट्रीय राजकारण आणि इतिहास वाचायला नेहमीच आवडते. मला कविता आणि इतरही गोष्टींवर लिहायला आवडते. यूपीएससीच्या माध्यमातून भारतीय परराष्ट्र सेवेतद्वारे देशाची सेवा करणे हे माझे स्वप्न आणि ध्येय आहे.

### महाराष्ट्र जनमुद्राचे संपादक डॉ. दीपक दळवी यांना मातृशोक




ठाणे – दैनिक महाराष्ट्र जनमुद्राचे संपादक डॉ. दीपक दळवी यांच्या मातोश्री सौ.सुलोचना महिपत दळवी (वय ७६) यांचे रविवार, दि. ५ मे २०२४ रोजी दुपारी अल्पशा आजाराने दु:खद निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, दोन मुले, दोन मुली, सुना आणि नातवंडे असा परिवार आहे. जवारहर बाग येथील स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. विविध क्षेत्रातील मान्यवर मंडळी यावेळी उपस्थित होती. दशक्रिया विधी मंगळवार, दि. १४ मे रोजी श्री कौपिनेश्वर मंदिर येथे तर उत्तरकार्य शुक्रवार, दि. १७ मे रोजी २२/००१, कल्पवृक्ष गार्डन, हायलॅण्ड रेसिडेन्सी समोर, ढोकाळी, ठाणे येथे होणार आहे.

**मतदार २० मे ला शिलाई मशीन समोरचं बटन दाबून आपल्याला विजयी करतील – सांबरे यांना विश्वास...**

## अपक्ष उमेदवार निलेश सांबरे यांचे निवडणूक चिन्ह... शिलाई मशीन...



कल्याण / भिवंडी : भिवंडी लोकसभा मतदारसंघातील अपक्ष उमेदवार व जिजाऊ संघटनेचे अध्यक्ष निलेश सांबरे यांना निवडणूक आयोगाकडून शिलाई मशीन हे निवडणूक चिन्ह देण्यात आले आहे. निवडणूक चिन्ह मिळाल्यानंतर आपण २० मे रोजी होऊ घातलेल्या निवडणुकीसाठी पूर्णतः सज्ज झाले आहोत. तसेच नागरिकांमधून मिळत असलेल्या भरघोस प्रतिसादानंतर २० मे रोजी सर्व मतदार शिलाई मशीनसमोरील बटन दाबून आपल्याला बहुमताने विजयी करतील असा विश्वास निलेश सांबरे यांनी बोलताना व्यक्त केला. २३–भिवंडी लोकसभा मतदारसंघात ३ मे पर्यंत उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मुदत होती तर ६ मे पर्यंत उमेदवारी अर्ज मागे घेणे आणि पात्र उमेदवारांना निवडणूक चिन्हाचे वाटप करण्याची प्रक्रिया पार पडली. जिजाऊ संघटनेच्या निलेश सांबरे यांना मिळालेले शिलाई मशीन हे चिन्ह अत्यंत खास असल्याचे सांबरे यांचे मत आहे. जिजाऊच्या महिला सक्षमीकरण प्रकल्पाअंतर्गत असंख्य महिलांना शिलाई मशीन वाटप करून त्यांना स्वावलंबी बनवणाऱ्या निलेश सांबरेंना शिलाई मशीन हेच निवडणूक चिन्ह मिळणे हा एक योगायोगच म्हणायला हवा. **(पान २ वर)**

## कल्याणमधील ठाकरे गटाचा सस्पेन्स संपला, अखेर या उमेदवाराने घेतली माघार

कल्याण – कल्याणमधून माजी महापौर रमेश जाधव यांचा अर्ज ठाकरे गटाकडून दाखल झाला होता. यामुळे वैशाली दरेकर की रमेश जाधव कोण उमेदवार असणार? हा सस्पेन्स निर्माण झाला होता. अखेर हा सस्पेन्स संपला आहे. ाकरे गटाकडून वैशाली दरेकर यांच्या पाठोपाठ आणखी एक उमेदवार दिला गेला होता. महायुतीमधील शिवसेना उमेदवार आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे पुत्र श्रीकांत शिंदे यांना टक्कर देण्यासाठी नवीन खेळी खेळली गेली होती. कल्याणमधून माजी महापौर रमेश जाधव यांचाही अर्ज ठाकरे गटाकडून दाखल झाला होता. यामुळे वैशाली दरेकर की रमेश जाधव कोण उमेदवार असणार? हा सस्पेन्स निर्माण झाला होता. अखेर हा सस्पेन्स संपला आहे. रमेश जाधव यांनी शेवटच्या क्षणी उमेदवारी अर्ज मागे घेतला आहे. यामुळे कल्याणमध्ये श्रीकांत शिंदे विरुद्ध वैशाली दरेकर अशीच लढत रंगणार आहे.

### रमेश जाधव यांची माघार

उद्धव सेनेकडून कल्याणमध्ये वैशाली दरेकर यांची उमेदवारी जाहीर करण्यात आली होती. त्यानंतर ३ मे रोजी मोठे ट्विस्ट करण्यात आले. ठाकरे गटाकडून आणखी एक उमेदवार रमेश जाधव यांनी अर्ज भरला. छाननीमध्ये ठाकरे गटाच्या दोन्ही उमेदवारांचे अर्ज वैध ठरले होते. त्यामुळे कोणता उमेदवार माघार घेणार? यावर चर्चा सुरु झाली होती. अखेर सोमवारी रमेश जाधव दुपारी दोन वाजता निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या कार्यालयात पोहचले. त्यांनी अर्ज मागे घेतला. यामुळे उद्धव ठाकरे यांची कल्याणची रणनीती स्पष्ट झाली. ठाकरे गटाने उमेदवार बदलला नाही.

# ठाणे परिवहनच्या चालकाचा मस्तवालपणा–नागरिकांची तारांबळ

**ठाणे – ठाणे परिवहन सेवेला उभारी मिळत असतानाच परिवहन सेवेच्या बसेसच्या नियोजनात सावळागोंधळ असलयाचे चित्र पाहायला मिळते. तर मुख्यमंत्र्यांच्या बालेकिल्ल्यात वागळे डेपोच्या बसेसचे अपुरे नियोजन आणि परिवहनच्या चालकांची मनमानी आणि मस्तवालपणा यामुळे ठाणेकर आणि ज्येष्ठ नागरिकांना त्रास सहन करावा लागतो आहे.**

सध्याच्या स्थितीला ठाण्याच्या रस्त्यावर धावणाऱ्या परिवहन बसेसची संख्या हि ४८७ पेक्षा अधिक आहे. मात्र परिवहन बसेसचे नियोजन फोल ठरत असलयाचे चित्र पाहायला मिळते आहे. ठाण्याच्या सॅटिस वरील प्रवाशांना ताटकळत बसची वाट पाहावी लागत असून इतर ठिकाणी जाणाऱ्या बसेस दोनचार प्रवासी घेऊन जाताना दृष्टीस पडत आहे. पिकअप हावरमध्ये वागळे डेपोच्या बसेस या किमान अर्धा आणि पाऊण तासाला एक बस येते. त्यामुळे बसमध्ये प्रवाशी स्टँडिंग राहून प्रवास करू इच्छित असताना चालक मात्र प्रवाशी बस मध्ये चढतात कि नाही हे न पाहता बस सुरु करून पुढे निघतात. तर प्रवासी बसच्या मागे पळतानाचे विदारक चित्र पाहायला मिळते हि सकाळची आणि दुपारची परिस्थिती आहे. सकाळी चाकरमानी, दुपारी जेष्ठ नागरिक आणि विद्यार्थी, शाळकरी मुले, पालक यांची गर्दी असते तर संध्याकाळी तर कामावरून घरी जाणारे चाकरमानी, विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक, स्टेशनला खरेदीसाठी आलेले ठाणेकर विविध भागात जाण्यासाठी बस स्टोपवर बसची वाट पाहत बसलेले अढलतात. ५०० च्या आसपास बसची संख्या असताना काही बसेस या आजारही असतील मात्र पूर्वी पेक्षा **(पान २ वर)**

### चालकांचा मस्तवाल पणा, अनेक छुटपूट अपघात घडतात

ठाण्याच्या सॅटीसवरील प्रकार पाहता परिवहनच्या नियोजनाच्या तीनतेरा वाजल्याचे समोर येईल. तर दुसरीकडे परिवहन बसस्टोप वरून निघणाऱ्या बसेस मध्ये प्रवाशांना चढण्या इतपत वेळ परिवहनच्या चालकांना नसतो. लोक दरवाजात लटकत असताना पुढचा आणि मागचा दरवाजा बंद करण्याची शिस्त पाळण्याचा कटाक्ष हे वाहन चालक करताना दिसतात. अनेकवेळा या दरवाजात प्रवाशी अडकतात. नागरिकांनी आरडाओरडा केल्यानंतर दरवाजा उघडण्यात येतो. वातानुकूलित बसमध्ये प्रवासी प्रारंभीच्या सॅटिस वरील स्टोपवर चढताना दरवाजात असतानाच दरवाजा बंद केल्याने तरुणाचा हात दरवाजात अडकला. अशा वेळी जर अपघत घडला तर जबाबदार कोण? असा प्रश्न आता नागरिकच उपस्थित करीत आहेत.



### रात्रीच्या वेळेला चालकाच्या मर्जीनुसार स्टोपवर थांबतात बसेस...

ठाणेकरांनी दळणवळणासाठी रिक्षा, खाजगी बसेस आणि अन्य साधने उपलब्ध असतानाही परिवहनला मोठा प्रतिसाद ठाणे परिवहनला दिल्याची माहिती परिवहन व्यवस्थापक एनबीच कबुली दिली. मात्र परिवहनच्या बस चालकांना संस्कृतीचे धडे देणे गरजेचे आहे. बसेस या प्रवाशांसाठी आहे. मनाला लई तर थांबायचे नाहीतर थेट निघून जायचे हि परिवाहांची शिस्त आहे काय असा सवाल रविवारी एका ज्येष्ठ नागरिकाने उपस्थित केला. परिवहन सेवा हि ठाणेकरांशी सामाजिक बांधिलकी जपत वाटचाल करताना बसचालकांच्या बेशिस्त पणामुळे परिवहनच्या लौकिकाला कलंकित करीत आहेत. रविवारी रात्री ९–३९ वाजण्याच्या सुमारास उत्सव हॉटेलच्या समोरील बसस्टोपवर ज्येष्ठ नागरिक बसची वाट पाहत होते. ते बसस्टोपमध्ये बसले. एक साधी बस या स्टोपवर थांबली. एक तरुण पळत आला पण बस निघून गेली. याच स्टोपवर ज्येष्ठ नागरिक आणि एक तरुण थांब्याच्या बाहेर उभा होता. एक वातानुकुलीत बस आली तरुणाने हात दाखविला. तर बस न थांबता आणि ज्येष्ठ नागरिक बस पकडण्यासाठी बसस्टोपमधून बाहेर येउयापूर्वीच एका तरुणाला पाहून वातानुकूलित बस ही रिकामी गेली. अशा प्रकारचा मस्तवाल पण चालकांद्वारे करण्यात येत असलायचा अनुभव आहे.

# लोकनेते दि. बा. पाटील आंतरराष्ट्रीय विमानतळावर आपले सहर्ष स्वागत आहे, अशी घोषणा होणार - उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**पनवेल – डिसेंबर अखेरीस विमानतळाचे काम पूर्ण होईल आणि जेव्हा विमान येथून उडेल त्यावेळी लोकनेते दि. बा. पाटील आंतरराष्ट्रीय विमानतळावर आपले सहर्ष स्वागत आहे, अशी घोषणा होईल अशी ग्वाही राज्याचे उपमुख्यमंत्री बुलंद तोफ देवेंद्र फडणवीस यांनी खारघर येथे आज झालेल्या भव्य जाहीर प्रचार सभेत दिली. भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, मनसे, आरपीआय, रासप, पीआरपी व मित्रपक्ष महायुतीचे उमेदवार खासदार श्रीरंग बारणे यांच्या प्रचारार्थ राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भव्य जाहीर प्रचार सभा रामशेठ ठाकूर पब्लिक स्कुलच्या मैदानावर झाली. त्यावेळी ते बोलत होते.**



यावेळी व्यासपीठावर माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, महायुतीचे उमेदवार खासदार श्रीरंग बारणे, भाजपचे प्रदेश सदस्य बाळासाहेब पाटील, भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, महानगरपालिकेचे माजी सभागृहनेते परेश ठाकूर, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे, दिबांचे चिरंजीव अतुल पाटील, माजी महापौर कविता चौतमोल, उपजिल्हाप्रमुख परेश पाटील, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष महादेव पाटील, प्रदेश सरचिटणीस भीमसेन माळी, प्रदेश चिटणीस शिवदास कांबळे, मनसेचे जिल्हाध्यक्ष संदेश ठाकूर, महानगर प्रमुख योगेश चिले, आरपीआयचे जिल्हाध्यक्ष नरेंद्र गायकवाड, शिवसेनेचे महानगर प्रमुख प्रथमेश सोमण, भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, पनवेल शहर अध्यक्ष अनिल भगत, जिल्हा सरचिटणीस ॲड. प्रकाश बिनेदार, नितीन पाटील, दीपक बेहेरे, चारुशिला घरत, जिल्हा उपाध्यक्ष प्रिया मुकादम, महिला मोर्चाच्या जिल्हाध्यक्षा आश्रि्वनी पाटील, भाजपचे खारघर अध्यक्ष प्रवीण पाटील, कामोठे अध्यक्ष रवींद्र जोशी, कळंबोली अध्यक्ष रविनाथ पाटील, शिवसेनेचे तालुकाप्रमुख रुपेश ठोंबरे, माजी नगरसेवक हरेश केणी, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, अल्पसंख्याक समाजाचे जिल्हाध्यक्ष मन्सूर पटेल, अनुसूचित जाती सेलचे जिल्हाध्यक्ष अमित जाधव, ओबीसी सेलचे जिल्हाध्यक्ष राजेश गायकर आदी उपस्थित होते. या सभेला पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस पुढे म्हणाले कि, १९९० मध्ये विमानतळ होणार स्वप्न पहिले होते, पण प्रत्यक्षात विमानतळ साकारण्याचे काम मोदीजींनी केले. मेट्रो, विमानतळाच्या कामाचा पाठपुरावा आमदार प्रशांत ठाकूर यांनी केले आणि त्यांना खासदार श्रीरंग बारणे यांची साथ मिळाली. भूमिपुत्रांना सोबत घेऊन येथील चित्र विकासात बदलण्याचे काम झाले असून अटल सेतूमुळे मोठ्या प्रमाणात कनेक्टिव्हीटी वाढणार आहे. आणि त्यामुळे हा परिसर आर्थिक राजधानी होणार आहे. पनवेल आणि आजूबाजूच्या परिसरात विकास करण्याचे काम लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर यांनी केले असल्याचे सांगतानाच येथील प्रश्न मार्गी लावण्यासाठी आमदार प्रशांत ठाकूर यांच्या सातत्यपूर्ण पाठपुरावा कायम असतो. पनवेल महानगरपालिकेला अमृत योजना असू द्या किंवा जीएसटीचा परतावा मिळवून द्यायचा श्रेय मला ते देत असले तरी खरा श्रेय त्यांचे आहे. दरवर्षी ७२ कोटी रुपये जीएसटी ऐवजी आता ४०० कोटी रुपये जीएसटी परतावा त्यांच्याच पाठपुराव्यातून शक्य झाला आहे, असेही त्यांनी आवर्जून नमूद करताना पनवेल परिसरात जास्तीत जास्त विकासकामे करून घेण्यासाठी आमदार प्रशांत ठाकूर यांचा सातत्यपूर्ण पाठपुरावा असतो, असेही त्यांनी यावेळी अधोरेखित केले. या परिसरात विमानतळ, मेट्रो तसेच इतर महत्वाकांक्षी प्रकल्प आणि त्या अनुषंगाने परिसराचा विकास झाला पाहिजे यासाठीही नेहमी आमदार प्रशांत ठाकूर यांचा आग्रह राहिला आहे. आमदार प्रशांत ठाकूर कार्यसम्राट आहेत, त्यांचा जनसंपर्क दांडगा आहे, त्यामुळे पिंपरी चिंचवडच्या मतांचा रेकॉर्ड पनवेल तोडणार आहे, असा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला. हि देशाच्या अस्तित्वाची निवडणूक आहे त्यामुळे देश कोणाच्या हातात सुरक्षित राहू शकते तर ते फक्त पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याच. पूर्वी देशाच्या इन्फ्रा स्ट्रक्चरवर दरवर्षी एक लाख कोटी रुपये खर्च केले जायचे पण मोदी सरकार आल्यावर दरवर्षी १३ लाख कोटी रुपये खर्च करून प्रकल्प, पायाभूत सुविधांवर भर देण्यात आला त्यामुळेच आपला देश मोठ्या प्रमाणात विकास करू शकला, असेही फडणवीस यांनी सांगितले. शेतकरी, मच्छिमार, कामगार यांचा विचार मोदींनी केला असे सांगतानाच विश्वकर्मा योजनेतून बारा बलुतेदारांचा विचार मोदीजींनी केला आणि आपल्या देशाच्या इतिहास पहिल्यांदाच असे घडले आहे. असेही त्यांनी म्हंटले.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुढे म्हंटले कि, खरी शिवसेना एकनाथ शिंदे यांचीच आहे. बाळासाहेबांचे विचार जिवंत ठेवण्याचे काम शिंदेनी केले आहे. उद्धव ठाकरे बाळासाहेबांच्या संपत्तीचे वारसदार असतील पण



बाळासाहेबांच्या विचारांचे वारसदार नाहीत, असा घणाघाती त्यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर केला. महायुतीच्या मेट्रोला नरेंद्र मोदी नावाचे इंजिन आहे. त्यामुळे त्यामागे कितीही बोगी जोडल्या जाऊ शकतात. इंडिया आघाडीतील सगळेच स्वत: इंजिन असल्याचे सांगतात. प्रत्येकजण बोगी स्वत:कडे ओढण्याचा प्रयत्न करतो. त्यामुळे त्यांचं इंजिन हलतही नाही आणि डुलतही नाही. इंडिया आघाडीच्या इंजिनला डबेच नाहीत. त्यामुळे त्यांच्या इंजिनमध्ये फक्त घरातलीच माणसे बसू शकतात. राहुल गांधी यांच्या इंजिनमध्ये प्रियंका गांधी, उद्धव ठाकरे यांच्या इंजिनमध्ये आदित्य ठाकरे, शरद पवारांच्या इंजिनमध्ये सुप्रिया सुळे बसतील. त्यामुळे त्यांच्याकडे सामान्य माणसाला जागा नाही. तर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मेट्रोत देशातील तळागाळातील घटकांसाठी जागा आहेत. सबका साथ सबका विश्वास या अनुषंगाने मोदीजी काम करत आहेत तर इंडिया आघाडी म्हणजे २४ पक्षांची खिचडी झाली आहे, अशा टोलाही त्यांनी हाणला. पंतप्रधान नरेंद्र मोदी वैश्विक नेतृत्व आहे. भारतात मोदींमुळे लस तयार झाली आणि आपल्या देशासोबत जगालाही संजिवनी दिली त्यामुळे जगातील १०० देश भारताच्या पाठीशी आहेत, असेही फडणवीस यांनी नमूद केले. कॉंग्रेस सरकार असताना बॉम्बस्फोट झाल्यावर फक्त पाकिस्तानचा निषेध करायचे पण मोदीजी पंतप्रधान झाल्यावर पाकिस्तानात घुसून सर्जिकल स्ट्राईक केले आणि आता पाकिस्तनाची हिंमत पण होत नाही. भारत चंद्रयान पाठवतो आणि तिकडे पाकिस्तान भिकेचा कटोरा घेऊन उभा आहे, यातूनच नेतुत्व सिद्ध होत आहे. असेही त्यांनी म्हंटले. त्यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पुन्हा पंतप्रधान करण्यासाठी आपला हक्काचा लोकप्रतिनिधी म्हणून श्रीरंग बारणे यांना लोकसभेत पुन्हा पाठवा, असे आवाहनही उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी केले.

यावेळी खासदार श्रीरंग बारणे यांनी बोलताना गेल्या दहा वर्षांत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली काम करत असताना मतदार संघात अनेक कामे केल्याची माहिती दिली. मोदींच्या नेतृत्वाखाली आपला देश महासत्तेकडे वाटचाल करत असून विकासात्मक मुद्दे घेऊन आम्ही मतदारांपर्यंत पोहोचत आहोत तर विरोधकांकडे मुद्दे नसल्याने ते फक्त टीकात्मक मुद्दे घेऊन फिरत आहेत, असेही त्यांनी म्हंटले. दहा वर्षे मला प्रेम दिले यापुढेही द्या आणि तुमचा प्रतिनिधी म्हणून मला लोकसभेत काम करण्याची संधी द्या असे आवाहनही बारणे यांनी केले. विमानतळाला लोकनेते दि. बा. पाटील यांचे नवा दिले जाईल असा विश्वासही त्यांनी व्यक्त करताना पनवेलच्या पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी मार्गी लागत आहे असे नमूद करून पनवेल महानगरपालिकेसंदर्भातील शास्ती कर माफ करावा, अशीही मागणी त्यांनी यावेळी केली.

यावेळी बोलताना आमदार प्रशांत ठाकूर यांनी खासदार श्रीरंग बारणे यांना प्रचंड मतांनी विजयी करण्याची ग्वाही दिली. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी केलेले काम विश्वासात बदलले आणि हा विश्वास गॅरेंटीमध्ये बदलला. आणि संपूर्ण देशामध्ये विकासाचे पर्व निर्माण झाले. विमानतळाचे काम लवकर पूर्ण होऊन या ठिकाणी हजारोंच्या संख्येने रोजगाराच्या संधी निर्माण होणार आहेत.लोकनेते दि. बा. पाटील यांचे नाव लागले पाहिजे हि सर्व भूमिपुत्रांची प्रकल्पग्रस्तांची मागणी आहे आणि त्याला देवेंद्रजी फडणवीस यांनी पाठिंबा दिला आहे त्याबाद्दल मी आभार मानतो. अटल सेतू पूर्ण झाले आता उरण ते चौक ३२०० कोटींचा महामार्ग तयार होऊन या परिसराचा संपर्क अधिक वाढणार आहे. पनवेल महापालिकामध्ये अमृत योजना मिळाली, न्हावा शेवा टप्पा ३ मधून दरदिवशी १५० एमएलडी पाणी मिळणार आहे आणि पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटणार आहे. येथील विजेच्या संदर्भात सुविधांसाठी ४८० कोटींचा निधी, जीएसटीचा परतावा, अशी अनेक कामे देवेंद्रजी फडणवीस यांनी करत पनवेलच्या विकासाला चालना दिली आहे. असेही त्यांनी नमूद केले. महानगरपालिकेचा टॅक्स भरू नका टॅक्स माफ करून देतो अशा काही लोकांनी वल्गना केल्या, नागरिकांना टॅक्स भरू दिला नाही, त्यामुळे महानगरपालिकने मालमत्ताधारकांना नोटीस पाठवल्या आणि शास्ती लागल्या. वल्गना करणाऱ्यांचे ते स्वार्थी राजकारण होते. पण डबल टॅक्सेस रद्द करा अशी आमची मागणी आहे, असेही आमदार प्रशांत ठाकूर यांनी यावेळी आपल्या मागणीतून अधोरेखित केले.

सर्वसामान्य माणसाच्या कल्याणासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या दहा वर्षात केलेल्या कामाचा आढावा मांडला. भाजपने कधीही जातीपातीचे राजकारण केले नाही, तर देशातील प्रत्येक समाजाच्या उन्नतीसाठी काम करत आहे. देशाचा अधिकाधिक विकास करण्यासाठी पुन्हा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पंतप्रधान करण्यासाठी सज्ज राहू या आणि आपल्या मावळ लोकसभा मतदार संघातून खासदार श्रीरंग बारणे यांना पुन्हा मताधिक्याने विजयी करू या.

**–अविनाश कोळी,** जिल्हाध्यक्ष– भाजप

अनेक कामे खासदार श्रीरंग बारणे यांनी केली आहेत मात्र विरोधकांकडे कोणताही मुद्दा नाही, आणि दृष्टिकोनही नाही त्यामुळे विरोधक फक्त आरडाओरड करत आहे. त्यांची मतलबी भूमिका जनतेला माहीत आहे.

– **रामदास शेवाळे,** जिल्हाप्रमुख, शिवसेना

शेवटच्या घटकाला न्याय मिळवून देण्याच्या दृष्टीकोनातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधान दिले आणि या अनुषंगाने काम करत बाबासाहेबांनी दिलेली राज्य घटना समृध्द करण्याचे काम पंतप्रधान नरेंद्र मोदी हे करत आहेत. राज्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांची ताकद तर आमदार प्रशांत ठाकूर यांची जनशक्ती पाठीशी आहे, त्यामुळे खासदार श्रीरंग आप्पा बारणे प्रचंड मतांनी विजयी होतील.

– **शिवदास कांबळे,** प्रदेश चिटणीस– राष्ट्रवादी काँग्रेस

आप्पा बारणे यांनी केलेल्या कामाचा धडाका सर्वांना माहिती आहे मात्र विरोधक स्वतःच्या स्वार्थासाठी अप्रचार करत आहे. पण सुज्ञ नागरिक त्यांच्या भूलथापांना बळी पडणार नाही.

– **परेश पाटील,** उपजिल्हा प्रमुख–शिवसेना

पंतप्रधान नरेंद्र मोदीजींनी महिलांसाठी अनेक योजना अंमलात आणल्या आणि त्यामुळे देशातील कन्या ते ज्येष्ठ महिलांना त्याचा लाभ होतो आहे. त्यामुळे पुन्हा एकदा मोदी सरकार ही काळाची गरज बनली आहे.

– **चारुशीला घरत,** जिल्हा सरचिटणीस– भाजप

जेव्हापासून मुख्यमंत्री पद गेले तेव्हापासून उध्दव ठाकरे रडके झाले आहेत. बाळासाहेबांच्या तत्वांना मूठमाती देऊन काँग्रेसच्या मांडीवर बसण्याचे काम उद्धव ठाकरे यांनी केले. त्यामुळे खऱ्या शिवसेनेने त्यांना पक्षातून हाकलून दिले आहे.

**– योगेश चिले,** मनसे – महानगरप्रमुख

भाजप जातीयवादी नाही तर सर्व समाजाला न्याय देण्यासाठी काम करणारा पक्ष आहे, संविधानाचा सन्मान करण्याचे काम मोदी सरकारने केला. सत्ता आल्यावर अनुसूचित जातीचे रामनाथ कोविंद यांना तर त्यानंतरच्या काळात आदिवासी समाजातील द्रौपदी मुर्मू यांना राष्ट्रपती करून तळागाळातील घटकांचा सन्मान केला आहे.

**– ॲड. प्रकाश बिनेदार,** जिल्हा सरचिटणीस – भाजप

देशाची महती जगात उज्वल करण्याचे काम पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले आहे. काँग्रेसच्या काळात देशाच्या सीमा असुरक्षित होत्या देश भयभीत होता. पण मोदी सरकार आल्यानंतर देशाच्या भविष्यासाठी मोदीजींनी पावले उचलली आणि अतिरेक्यांच्या कचाट्यातून मुक्त होत देश सुरक्षित झाला आहे.

**–नरेंद्र गायकवाड,** जिल्हाध्यक्ष – आरपीआय

## अपक्ष उमेदवार निलेश सांबरे यांचे निवडणूक चिन्ह... शिलाई मशीन...

**(पान १ वरून)** चिन्ह वाटप झाल्यामुळे त्यांचे समर्थक आणि कार्यकर्त्यांमध्ये आत्मविश्वास वाढल्याचे दिसून आले. तसेच आपले आई–वडील व हितचिंतक त्याचप्रमाणे मतदारसंघातील असंख्य समर्थकांचा आशीर्वादच जणू या चिन्हाच्या रूपाने आपल्याला मिळाला आहे अशी भावना सांबरे यांनी चिन्ह वाटप प्रक्रियेनंतर बोलून दाखवली. भिवंडी लोकसभेतील अपक्ष उमेदवार आणि जिजाऊ संघटनेचे अध्यक्ष निलेश सांबरे यांना निवडणूक चिन्ह म्हणून निवडणूक आयोगाकडून शिलाई मशीन हे चिन्ह मिळाले आहे. हे चिन्ह महिला सक्षमीकरणाचे, प्रगतीचे व उन्नतीचे प्रतिक असून जिजाऊ संस्था कायमच महिला सक्षमिकरण, रोजगार आणि विकासावर काम करत आलेली आहे. आज हेच निवडणूक चिन्ह म्हणून मिळाल्याने सर्वत्र आनंदाचे वातावरण असल्याच्या भावना यावेळी निलेश सांबरे यांनी व्यक्त केल्या.

## ठाणे परिवहनच्या चालकाचा मस्तवालपणा–नागरिकांची तारांबळ

**(पान १ वरून)** यंदाच्या वर्षी पुरेशी सुविधा देण्याच्या परिस्थितीत असलेल्या परिवहन सेवेच्या सुविधेत मात्र कुठलाच बदल नाही. त्यामुळे नियोजनाचा अभाव असल्याचे चित्र आहे. सकाळ दुपार आणि रात्री कुठल्या रूटवर भरपूर गर्दी असते, कुठल्या रूटवर गर्दीच नसते मात्र एकामागून एक बसेस रिकाम्या जातात. मात्र वागळे इस्टेट डेपोची बशी या तिन्ही वेळेला कधीच रिकामी जाताना दिसत नाही. तरी देखील परिवहन व्यवस्थापन हे बसेसचे नियोजन करण्यास फोल ठरत असलयाचे चित्र आहे.

## धर्मवीर सिनेमाचे दिग्दर्शक तुम्हीच मग प्रसंग खोटे कसे ?

**(पान १ वरून)** मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे २०१३ मध्ये ते पाच आमदारांना घेऊन कॉंग्रेसमध्ये प्रवेश करणार होते, वारंवार त्यांनी बंड करण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या शेवटच्या बंडा पर्यंत मी त्यांच्या सोबत होतो. मात्र त्यांना केवळ शिवसेना संपावयाचीच होती असा गंभीर आरोपही त्यांनी मुख्यमंत्र्यावर केला आहे. आमच्यामुळेच विचारे निवडून येत होते, असे देखील शिंदे म्हणाले होते, मात्र मागील दोन निवडणुकीत केवळ आपल्या पुत्राचेच काम शिंदे यांनी केले. ठाण्यातील सर्व यंत्रणा मिंधे तिकडे घेऊन जात असत त्यामुळे मी माझ्या स्वतःच्या जीवावर, स्वतःच्या कामावर निवडून आलो आहे. शिंदे यांनी केलेले बंड फोडलेली शिवसेना हे सर्व केवळ खुर्चीसाठीच होते, असाही आरोप त्यांनी यावेळी केला.

### शिवसेनेत मला ४० वर्ष झाली, यांचा उदय साहेब गेल्यानंतर झाला

आम्ही टेभी नाक्यावरील साहेबांचे कट्टर कार्यकर्ते होतो आणि अजूनही आहोत. मला शिवसेनेत ४० वर्ष झाली या बाकीच्यांचा उदय साहेब गेल्यानंतर झाला आहे. बाळासाहेबांचे विचार शिवसेना फोडण्यासाठी कधीच नव्हते, दिघे साहेबानी मोठं वादळ येऊन सुद्धा पक्ष एकसंघ ठेवला. दिघे साहेबांवर बाळासाहेबांचा विश्वास होता. याना मात्र शिवसेना संपवायची होती असा आरोप विचारे यांनी मुख्यमंत्र्यावर केला.

## महाराष्ट्रात एकेकाळी सर्वाधिक उत्पन्न देणाऱ्या भिवंडी बस आगाराची दुरवस्था, खासदार झाल्यानंतर दोन वर्षात सुसज्ज बस आगार उभारणार – निलेश सांबरे

भिवंडी – भिवंडी शहरातील एसटी बस आगाराची झालेली दुरवस्था जिजाऊ संघटनेचे निलेश सांबरे यांना प्रचारादरम्यान पाह्यला मिळाली. जिजाऊ संघटनेचे अध्यक्ष तथा भिवंडी लोकसभा मतदारसंघातील अपक्ष उमेदवार असलेले निलेश सांबरे यांनी गुरुवारी सायंकाळी सातच्या सुमारास भिवंडी शहरातील एसटी बस आगाराला भेट देत पाहणी केली. आपण खासदार म्हणून निवडून आल्यानंतर दोन वर्षात येथे सुसज्ज बस आगार उभारू, असे आश्वासन त्यांनी उपस्थित एसटी कर्मचारी आणि प्रवाशांशी संवाद साधताना दिले. गुरुवारी सांबरे यांनी आपली कार्यकर्त्यांसह भिवंडी येथील बस आगाराला भेट देत तेथील समस्यांची पाहणी केली. बस




आगाराच्या आवारात पडलेला कचरा आणि स्वच्छतेचा अभाव असल्याचे त्यांना आढळून आले. आगाराच्या काही भागात लाईट नव्हती. तेथील पाणपोईचे नळ गायब असल्याने पिण्याच्या पाण्याअभावी उन्हाळ्याच्या या काळात प्रवाशांचे हाल होताना दिसून आले. मुतारीची खराब अवस्था व सुटलेली दुर्गंधी आढळून या ठिकाणी आढळून आली. भिवंडी बस आगारात नजीकच्या व लांब पल्ल्याच्या बस ये–जा करतात. सुमारे लाखभर प्रवासी दिवसभरात या आगारातून प्रवास करतात. लांब पल्ल्याचा प्रवास करणाऱ्या बसच्या चालक–वाहकांना येथे आंघोळीची–विश्राम गृहाची, पिण्याच्या पाण्याची कोणतीच व्यवस्था नसल्याचे तेथील बस वाहकांनी सांबरे यांना सांगत आम्ही कामाला कसे जाणार, असा सवाल उपस्थित केला. एका बस वाहकाने तर बसची हेडलाईट तुटलेली असताना ती दुरुस्त करायला आगारात इलेक्ट्रिशियन नाही. अंधारात प्रवास करताना आम्ही बस ठोकायच्या का? असा थेट सवाल करीत प्रवाशांच्या जीवाला असलेल्या धोक्याकडे लक्ष वेधले. यावेळी अनेक महिला व पुरुष बस कर्मचाऱ्यांनी आपल्या समस्या सांबरे यांच्याकडे मांडल्या. यावेळी महिला कर्मचाऱ्यांनी एसटी कर्मचाऱ्यांच्या संप काळात निलेश सांबरे यांनी बस कर्मचाऱ्यांना केलेल्या मदतीची आठवण काढत त्यांचे पुनश्च आभार मानले. प्रवासी दोन तासापासून बसची वाट पाहत ताटकळत असल्याचे दिसले. सांबरे यांनी प्रवाशांशी संवाद साधला व त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. काही प्रवासी दोन तासापासून बसची वाट पाहत ताटकळत असल्याचे दिसले. यावेळी आपली प्रतिक्रिया व्यक्त करताना सांबरे म्हणाले की, नागरिकांना सोयीसुविधा मिळत नसताना आमचे लोकप्रतिनिधी काय करतात, असा प्रश्न पडतो. लोकप्रतिनिधींचे काम आहे की, समाजातील सर्व लोकांना मुलभूत सोयीसुविधा मिळवून देणे. मग भिवंडीचे लोकप्रतिनिधी भारतात राहत नाहीत का? ते नक्की कुठे राहतात हे तपासण्याची गरज असल्याचे देखील यावेळी सांबरे म्हणाले . आगारात महिलांसाठी प्रसाधन गृह उपलब्ध नाही, परिसरात वीज नाही. महिलांसंदर्भात काही अनुचित प्रकार प्रसंग घडू शकतो,अशी भीती सांबरे यांनी यावेळी व्यक्त केली.

# मुख्यमंत्र्यांच्या नरेश म्हस्केंना कानपिचक्या भाजप नेत्यांना दिलासा देण्याचा प्रयत्न

ठाणे : ठाणे लोकसभा मतदार संघासाठी नरेश म्हस्के यांची उमेदवारी जाहीर होताच, भाजपमध्ये उघड आणि दबक्या सुरात व्यक्त होत असलेल्या नाराजीचा अंदाज आल्याने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सोमवारी महायुतीच्या मेळाव्यात भाजप नेत्यांसमोरच कडक भूमिका घेऊन म्हस्के यांना कानपिचक्या दिल्या.

ठाणे महापालिकेतील राजकारण आणि अर्थकारणावर म्हस्के यांचा अनेक वर्षांपासून प्रभाव राहिला आहे. यामुळे सर्व पक्षीय नेत्यांमध्ये त्यांच्या या 'कारभारी' वृत्तीविषयी नाराजी व्यक्त झाली आहे. नेमका हाच धागा पकडून राजन विचारे यांनी म्हस्के यांना लक्ष करण्यास सुरुवात केली आहे. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्र्यांनी मेळव्यात बोलताना, तुम्हाला आता पालिकेत नव्हे तर संसद भवनात पाठिवले जाणार आहे. नगरसेवक, आमदार आणि पालिकेच्या कामात आडकाठी आणू नका, अशा शब्दात सुनावले. इथे भविष्यात बघण्यासाठी मी आहेच, त्याची काळजी करू नका, अशा शब्दात त्यांनी मित्रपक्ष भाजपच्या नेत्यांना आश्वस्त केले.

ठाणे महापालिकेत नरेश म्हस्के यांचा वर्षो नुवर्षे प्रभाव राहिला आहे. ठाण्यातील काँग्रेस, राष्ट्रवादी, भाजपमधील प्रभावी नेत्यांची मोट बांधून महापालिकेचा कारभार हाकण्यात म्हस्के तरबेज मानले जातात. परंतु म्हस्के यांच्या कार्यपद्धतीवर नाराज असलेल्या स्वपक्षीयांची संख्याही काही कमी नाही. तसेच भाजपमध्येही त्यांची ही कार्यपद्धती अनेकांना मान्य नाही. भाजपचे ठाणे शहर विधान सभेचे आमदार संजय केळकर यांनी अनेकदा म्हस्के



यांच्या कार्यपद्धती विषयी नाराजी व्यक्त केली आहे. महापालिकेतील त्यांचा वावर हा भाजपला रोखण्यासाठी असतो, अशा तक्रारी मुख्यमंत्र्यांकडे केल्या आहेत. स्वपक्षातील काही नेतेही म्हस्के हे गटातटाचे राजकारण करतात, अशा काही नेत्यांच्या तक्रारी आहेत. म्हस्के हे शिवसेनेतील नगरसेवकांची कामे मार्गी लावत असताना अनेकदा भाजप कार्यकर्ते आणि नगरसेवकांना आडवे येतात अशा तक्रारी यापूर्वी झाल्या आहेत. महायुतीच्या बैठकीपूर्वी आमदार केळकर यांनी मुख्यमंत्र्यांकडे याविषयी नाराजी व्यक्त केली.

### मुख्यमंत्र्यांकडून तक्रारीची दखल

म्हस्के यांची उमेदवारी जाहीर झाल्यानंतर भाजपमध्ये आलेल्या नाराजीची दखल मुख्यमंत्र्यांनी घेतली आहे. सोमवारी टिपटॉप प्लाझा येथे झालेल्या मेळाव्यात मुख्यमंत्र्यांनी म्हस्के यांनाच कानपिचक्या देत भाजप नेत्यांना दिलासा देण्याचा प्रयत्न केल्याची चर्चा रंगली आहे. मी आहे तसाच राहणार, असे नरेश म्हस्के या मेळाव्यात म्हणाले. नेमका हाच धागा पकडून मुख्यमंत्र्यांनी सांगितले, ''मी आहे तसाच राहाणार. पण, तसे राहून आता चालणार नाही. तुम्हाला स्वत:मध्ये बदल करावा लागणार आहे. हे माझे म्हणणे नाही तर ही भाजप आमदार संजय केळकर यांची मागणी आहे. माणसाकडून काहीवेळेस काही गोष्टी घडतात. त्यामुळे तुमच्याकडून काही घडले असेल. आता तुम्ही खासदार होणार आहात. आता तुम्हाला बदलावे लागेल, हे लक्षात ठेवा. पालिका, नगरसेवक, आमदार यांच्या कामात आडकाठी आणू नका, अशा शब्दात मुख्यमंत्र्यांनी म्हस्के यांना सल्ला दिला. इथे काय होते आहे ते पाहण्यासाठी मी आहेच, त्यामुळे त्याची काळजी करू नका, अशा शब्दात त्यांनी भाजप नेत्यांना दिलासा दिला.

मुख्यमंत्र्यांचे आनंद दिघेंबाबत मोठे वक्तव्य

# रुग्णालयात असताना पद सोडायला सांगितल्याने दिघे बैचेन होते

ठाणे : शिवसेनेचे दिवंगत ठाणे जिल्हाप्रमुख आनंद दिघे यांची लोकप्रियता सलत होती. यामुळेच त्यांना पदावरून बाजूला करण्याचे कारस्थान आणि डाव होता आणि रुग्णालयात असताना त्यांना तसा निरोपही आला होता. यामुळे दिघे बैचेन होते, असा गौप्यस्फोट मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सोमवारी ठाण्यात पत्रकारांशी बोलताना केला. तसेच धर्मवीर चित्रपटात आधी काही गोष्टी खऱ्या दाखविल्या नव्हत्या. परंतु आता पुढच्या भागात सगळे खरे दाखविणार, असेही ते म्हणाले.

ठाणे लोकसभा मतदार संघातील शिवसेनेचे उमेदवार नरेश म्हस्के यांच्या निवडणूक प्रचारार्थ सोमवार, टीप टॉप प्लाझा येथे महायुतीचा मेळावा आयोजित करण्यात आला होता. यामध्ये मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना आणि त्यानंतर पत्रकारांशी बोलताना त्यांनी आनंद दिघेंना मातोश्रीने मानसिक त्रास दिल्याचा आरोप केला. ठाणे आणि पालघर जिल्हा हा एकच होता. त्याचे नेतृत्व आनंद दिघे हे करत होते. त्यांना मातोश्रीने पद आणि जिल्हा सोडायला सांगितले होते. परंतु दिघे यांनी पद आणि जिल्हा सोडला तर, आपल्यासोबत एकही माणूस राहणार नाही, असे अनेकांनी त्यांना सांगितले. त्यानंतर त्यांनी निर्णय मागे घेतला, असा असा गौप्यस्फोट मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केला.

दिघे हे फकीर माणूस होते, दोन्ही हाताने वाटणारे होते आणि शाखेत राहत होते. पण दिघे यांच्या निधनानंतर मला त्यांची मालमत्ता विचारली. तेव्हाच आपण चुकीच्या ठिकाणी आल्याची मला जाणीव झाली. परंतु नाईलाजाने काम करत होतो, असेही ते म्हणाले. या मेळाव्यानंतर पत्रकारांशी बोलताना त्यांनी शिवसेनेचे दिवंगत ठाणे जिल्हाप्रमुख आनंद दिघे यांची लोकप्रियता सलत होती. यामुळेच त्यांना पदावरून बाजूला करण्याचे कारस्थान आणि डाव होता आणि रुग्णालयात असताना त्यांना तसा निरोपही आला होता. यामुळे दिघे बैचेन होते, असे सांगितले.

माझ्या बाबतीत वाईट घटना घडल्यानंतर आनंदी यांनी मला सभागृहनेता पद देतो असे सांगितले. परंतु मी घटनेमुळे खचलेला असल्याने ही जबाबदारी पार पाडू शकणार नाही असे त्यांना सांगितलं होतं परंतु ते माझ्यासाठी दैवत होते. त्यामुळे त्यांचा आग्रह मी नाकारू शकलो नव्हतो. राजन विचारे यांनी सभागृहनिता पदाचा राजीनामा सहजा सहजी दिला नव्हता आणि राजीनामा देताना त्यांनी दिघे यांच्याबाबत अपशब्द वापरले होते. त्यामुळे धर्मवीर सिनेमांमध्ये जे काय दाखवलं ते खूप चांगल्या प्रकारे दाखवण्यात आले होते. मात्र ते काही खरे नसून सिनेमाच्या पुढच्या भागात सर्व काही खरे दाखवू, असेही ते म्हणाले.

**ठाणे महानगरपालिका, ठाणे**

सा.बां.विभाग
निविदा सुचना

ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील मुंब्रा प्रभाग समिती क्षेत्रातील " रस्ते दुरुस्ती " लेखाशिर्षका अंतर्गत ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील मुंब्रा प्रभाग समिती अंतर्गत रस्त्यांची दुरुस्ती करणे. (सन २०२४-२५) या **एक** कामांकरिता ऑनलाईन निविदा मागविण्यात येत आहेत. ज्या कंत्राटदारांविरुध्द शासकीय/ निमशासकीय/ सार्वजनिक क्षेत्रातील संस्था व उपक्रम / स्थानिक स्वराज्य संस्था इ. यांनी शिस्तभंगाचे कार्यवाहिच्या अनुषंगाने नोंदणी पत्र रद्दकरण्याची कार्यवाही केली / सुरु आहे, अशा कंत्राटदारांना निविदाप्रक्रियेत भाग घेता येणार नाही. निविदा सुचना ठाणे महानगरपालिकेचे संकेतस्थळ वर दि. ०७/०५/२०२४ ते दि.१४/०५/२०२४ पर्यंत उपलब्ध आहे. ऑनलाईन निविदा महापालिकेचे संकेतस्थळ येथे https:://mahatenders.gov.in दि. १४/०५/२०२४ रोजी पर्यंत सायं. १६.०० वाजेपर्यंत स्विकारण्यात येतील. निविदा दि.१६/०५/२०२४ सायं. १६.०० वा. निविदाकारअथवा त्यांचे प्रतिनिधीसमक्ष उघडण्यात येतील.

ठामपा/पिआरओ/ सा.बा -मुं.प्र.स/२१/२०२४-२५ सही/-
दि.०६.०५.२०२४ कार्यकारी अभियंता
Pls visit our oficial web-site ठाणे महानगरपालिका, ठाणे
www.thanecity.gov.in

## भारतीय आर्थिक/सांख्यिकी सेवा परीक्षा

- जागा : ४८ जागा
- IES भारतीय आर्थिक सेवा परीक्षा
- ISS भारतीय सांख्यिकी सेवा परीक्षा
- शैक्षणिक पात्रता:
- IES : पदव्युत्तर पदवी. (Economics/Applied Economics/ Business Economics/Econometrics)

ISS: nXdr (Statistics/Mathematical Statistics/Applied Statistics) किंवा पदव्युत्तर पदवी (Statistics/ Mathematical Statistics/Applied Statistics)
वयाची अट: ०१ ऑगस्ट २०२४ रोजी २१ ते ३० वर्षे, SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट

- वय गणकयंत्र: वय मोजा
- नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत.
- Fee: General/OBC: 200/- SC/ ST/PWD/महिला:फी नाही
- अर्ज करण्याची शेवटची तारीख: ३० एप्रिल २०२४
- परीक्षा: २१ जून २०२४
- अधिकृत वेबसाईट: https://upsc.gov.in/

## मुंबई नेव्हल डॉकयार्ड

- पदाचे नाव: अप्रेंटिस (प्रशिक्षणार्थी)

१ इलेक्ट्रिशियन
२ इलेक्ट्रोप्लेटर
३ फिटर
४ फाउंड्रीमन
५ मेकॅनिक
६ इन्स्ट्रुमेंट मेकॅनिक
७ मशीनिस्ट
८ चचढच्
९ पेंटर
१० पॅटर्न मेकर
११ पाईप फिटर
१२ इलेक्ट्रॉनिक्स मेकॅनिक
१३ मेकॅनिक Reff.
१४ शीट मेटल वर्कर ०३
१५ शिपराईट (Wood) १८
१६ टेलर (G) ०३
१७ वेल्डर (G E) २०
१८ मेसन (BC) ०८
१९ I CTSM² ०३
२० शिपराईट (Steel) १६
२१ रिगर १२
२२ फोर्जर हीट ट्रीटर ०१

- शैक्षणिक पात्रता:

रिगर: ०८वी उत्तीर्ण
फोर्जर हीट ट्रीटर: १०वी उत्तीर्ण
उर्वरित पदे: संबंधित ट्रेड मध्ये ITI (NCVT/SCVT)

- शारीरिक पात्रता: उंची छाती वजन १५० सेमी फूगवून ०५ सेमी जास्त ४५

वयाची अट: किमान १४ वर्षे SC/ST: ०५ वर्षे सूट

- अर्ज करण्याची शेवटची तारीख: १० मे २०२४
- परीक्षा: मे/जून २०२४
- अधिकृत वेबसाईट: https://www.indiannavy.nic.in/

## केंद्रीय सशस्त्र पोलीस दल

- परीक्षेचे नाव: संयुक्त केंद्रीय सशस्त्र पोलीस दल (असिस्टंट कमांडंट) परीक्षा २०२४
- जागा : ५०६
- पदाचे नाव: असिस्टंट कमांडंट

1 BSF
2 CRPF
3 CISF
4 ITBP
5 SSB

- शैक्षणिक पात्रता: कोणत्याही शाखेतील पदवी.
- शारीरिक पात्रता:

पुरुष/महिला उंची छाती वजन
पुरुष १६५ से.मी. ८१-८६ से.मी. ५० ज्ञस
महिला १५७ से.मी. - ४६ ज्ञस

- वयाची अट: ०१ ऑगस्ट २०२४ रोजी २० ते २५ वर्षे SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
- वय गणकयंत्र: वय मोजा
- नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत.
- Fee: General/OBC: 200/- SC/ ST/महिला: फी नाही
- अर्ज करण्याची शेवटची तारीख: १४ मे २०२४
- लेखी परीक्षा: ०४ ऑगस्ट २०२४
- अधिकृत वेबसाईट: https://www.mha.gov.in/en/about-us/central-armed-police-forces

## स्टाफ सिलेक्शन कमिशन

- परीक्षेचे नाव: संयुक्त उच्च माध्यमिक (१०+२) स्तर (CHSL) परीक्षा २०२४
- पदाचे नाव तपशील:

१ कनिष्ठ विभाग लिपिक / कनिष्ठ सचिवालय सहाय्यक
२ डेटा एंट्री ऑपरेटर
३ डेटा एंट्री ऑपरेटर

- शैक्षणिक पात्रता: १२वी उत्तीर्ण.
- वयाची अट: ०१ ऑगस्ट २०२४ रोजी १८ ते २७ वर्षे SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
- वय गणकयंत्र: वय मोजा
- नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत.
- Fee: General/OBC: 100/- SC/ST/PWD/ ExSM²/महिला: फी नाही
- अर्ज करण्याची शेवटची तारीख: ०७ मे २०२४
- परीक्षा:Tier-I: जून-जुलै २०२४ Tier-II: नंतर सूचित केले जाईल.
- अधिकृत वेबसाईट: https://ssc.nic.in/

## भारतीय सैन्य

- कोर्सचे नाव: 140th टेक्निकल पदवीधर कोर्स जानेवारी २०२५
- पदाचे नाव: TGC
- शैक्षणिक पात्रता: संबंधित विषयात इंजिनिअरिंग पदवी किंवा इंजिनिअरिंगच्या शेवटच्या वर्षातील उमेदवार.
- वयाची अट: जन्म ०२ जानेवारी १९९८ ते ०१ जानेवारी २००५ दरम्यान.
- नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत
- फी : फी नाही.
- अर्ज करण्याची शेवटची तारीख: ०९ मे २०२४
- अधिकृत संकेतस्थळ https://www.indianarmy.nic.in/

## आर्ममेंट रिसर्च डेव्हलपमेंट एस्टॅब्लिशमेंट

- जागा : २०
- ज्युनियर रिसर्च फेलो
- रिसर्च असोसिएट
- शैक्षणिक पात्रता:

पद क्र.१: प्रथम श्रेणी BE/B.Tech+NET/GATE किंवा प्रथम श्रेणी M.Sc+NET
पद क्र.२: (i) PhD (ii) ME/M.Tech (iii) ०३ वर्षे अनुभव
वयाची अट: २८ वर्षांपर्यंत SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट

- वय गणकयंत्र: वय मोजा
- नोकरी ठिकाण: पुणे
- : फी नाही.
- अर्ज पाठविण्याचा पत्ता: The Director, Armament Research Development Establishment (ARDE), Armament Post, Pashan, Pune- 411021
- अर्ज पोहचण्याची शेवटची तारीख: ३१ मे २०२४
- अधिकृत वेबसाईट: https://www.drdo.gov.in/drdo/labs-and-establishments/armament-research-development-establishment-arde

## दक्षिण पूर्व मध्य रेल्वे

- Grand Total : २७०७ जागा (८६१+१११३+७३३)
- P (SECR) अप्रेंटिस पदाच्या ८६१ जागांसाठी भरती (नागपूर)
- P (SECR) अप्रेंटिस पदाच्या १११३ जागांसाठी भरती (रायपूर)
- P (SECR) अप्रेंटिस पदाच्या ७३३ जागांसाठी भरती (बिलासपूर)
- जाहिरात क्र.: P/NGP/SAS/२०२४/१६
- आस्थापना क्र.: E०५२०२७०२६९५ E०५२०२७०२४९४
- Total: ८६१ जागा
- पदाचे नाव: अप्रेंटिस (प्रशिक्षणार्थी)
- शैक्षणिक पात्रता: (i) ५०% गुणांसह १०वी उत्तीर्ण (ii) संबंधित ट्रेड मध्ये ITI
- वयाची अट: १० एप्रिल २०२४ रोजी १५ ते २४ वर्षे SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
- वय गणकयंत्र: वय मोजा
- नोकरी ठिकाण: नागपूर
- फी : फी नाही.
- अर्ज करण्याची शेवटची तारीख: ०९ मे २०२४
- अधिकृत वेबसाईट: https://secr.indianrailways.gov.in/

## महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी लि.

- जागा : ५३४७
- पदाचे नाव: विद्युत सहाय्यक
- शैक्षणिक पात्रता: (i) १०+२ बंधातील माध्यमिक शालांत परीक्षा (१०वी) (ii) ITI (विजतंत्री/तारतंत्री (Electrician / Wireman) किंवा महाराष्ट्र राज्य व्यवसाय परीक्षा मंडळ यांनी प्रमाणित केलेले ०२ वर्षांचा पदविका (Electrician / Wireman) अभ्यासक्रम प्रमाणपत्र.
- वयाची अट: २९ डिसेंबर २०२३ रोजी १८ ते २७ वर्षे मागासवर्गीय/आ.दु.घ.: ०५ वर्षे सूट
- वय गणकयंत्र: वय मोजा
- नोकरी ठिकाण: संपूर्ण महाराष्ट्र
- फी : खुला प्रवर्ग: २५०/- मागासवर्गीय/आ.दु.घ./अनाथ: १२५/-
- अर्ज करण्याची शेवटची तारीख: २० मे २०२४
- अधिकृत वेबसाईट: https://www.mahadiscom.in/

## हिंदुस्थान उर्वरक आणि रसायन लिमिटेड

- जागा : ८०

१ मॅनेजर / (L2)
२ इंजिनिअर/ (L-1)
३ ऑफिसर/ (L-1)
४ चीफ मॅनेजर/ (L-3)
५ असिस्टंट मॅनेजर/(L1) FTC
६ ऑफिसर/(L1) FTC

- शैक्षणिक पात्रता:

पद क्र.१: (i) ६०% गुणांसह इंजिनिरिंग पदवी/B.Sc. (-gri)+ M.Sc./CA/CMA (ii) १२ वर्षे अनुभव
पद क्र.२: (i) ६०% गुणांसह इंजिनिरिंग पदवी (ii) ०२ वर्षे अनुभव
पद क्र.३: (i) ६०% गुणांसह इंजिनिरिंग पदवी/ MBA/CA/CMA (ii) ०२ वर्षे अनुभव
पद क्र.४: (i) CA/CMA/ PGDM²/ MBA (Finance) (ii) १९ वर्षे अनुभव
पद क्र.५: (i) ६०% गुणांसह पदवी/PG डिप्लोमा (Communication/ -dvertising Communication Management/Public Relations/ Mass Communication/ Journalism) किंवा MBA/MSW किंवा B.Sc. (Agri)+ M.Sc.(Agriculture) किंवा BSc.Agri/B.Tech+ MBA/PGDBM² (ii) ०७ वर्षे अनुभव
पद क्र.६: (i) LLB (ii) ०५ वर्षे अनुभव

- वयाची अट: २० मे २०२४ रोजी, SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट

पद क्र.१: ४० वर्षांपर्यंत
पद क्र.२: ३० वर्षांपर्यंत
पद क्र.३: ३० वर्षांपर्यंत
पद क्र.४: ४७ वर्षांपर्यंत
पद क्र.५: ४५ वर्षांपर्यंत
पद क्र.६: ३५ वर्षांपर्यंत

- वय गणकयंत्र: वय मोजा
- नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत
- फी : फी नाही.
- अर्ज करण्याची शेवटची तारीख: २० मे २०२४
- अधिकृत वेबसाईट: https://hurl.net.in/

## चंदनाच्या फेस पॅकने घालवा टॅनिंग

उन्हाळ्यात तीव्र सूर्यप्रकाशामुळे आणि घामामुळे त्वचेची संबंधित अनेक समस्या जाणवू लागतात. यातील प्रामुख्याने जाणवणारी समस्या म्हणजे स्किन टॅनिंग. टॅनिंगमुळे चेहऱ्याची त्वचा तर काळी पडतेच शिवाय चेहऱ्याची चमकही निघून जाते. अशावेळी एक साधा सोपा उपाय करून तुम्ही तुमच्या चेहऱ्याचे टॅनिंग दूर करू शकता. यासाठी केवळ चंदनाचा होममेड फेस पॅक बनवून चेहऱ्यावर तुम्हाला लावायचा आहे. चंदनाच्या फेसपॅकमुळे उन्हाळ्यात जाणवणारी टॅनिंगची समस्या सहजपणे दूर करता येते.

टॅनिंगची समस्या दूर करण्यासाठी तुम्हाला चंदनासोबत काही गोष्टी मिक्स करून त्याचा फेसपॅक चेहऱ्यावर लावायचा आहे.

### चंदन आणि गुलाबपाणी –

ऑईली स्किनसाठी चंदन आणि गुलाबपाण्याचा फेसपॅक उपयुक्त ठरतो. गुलाबपाण्यात अँटीबॅक्टरीअल, अँटिसेप्टिक असे अनेक गुणधर्म आढळतात, जे त्वचेच्या अनेक समस्या कमी करण्यास उपयोगी पडतात.

### पद्धत –

चंदनाच्या पावडरमध्ये गुलाबपाणी मिक्स करून पेस्ट तयार करा.
तयार पेस्ट चेहऱ्यावर १५ ते २० मिनिटे लावा.
१५ ते २० मिनिटांनंतर चेहरा स्वच्छ पाण्याने धुवून घ्या.
चंदन आणि गुलाबपाणी फेसपॅकमुळे तुमची टॅनिंगची समस्या कमी होण्यास मदत मिळते.

### चंदन आणि दही –

चंदनात अँटिएम्फलिमेंटरी, अँटीऑक्सीडेंट, अँटिपायरेटिक असे गुणधर्म आढळतात. त्यामुळे ड्राय स्किनसाठी चंदन आणि दह्याचा फेसपॅक लावणे फायद्याचे ठरते.

### पद्धत –

दह्यात चंदन पावडर मिक्स करा.
तयार चंदन आणि दह्याची पेस्ट चेहऱ्यावर लावा.
पेस्ट सुकल्यानंतर चेहरा स्वच्छ पाण्याने धुवून घ्या.
आठवड्यातून २ वेळ तुम्ही हा फेसपॅक चेहऱ्यावर लावू शकता.
चंदन आणि दह्यामुळे उन्हाळ्यात तीव्र उन्हामुळे जाणवणारी टॅनिंगची समस्या दूर होण्यास मदत मिळेल.

### चंदन आणि हळद –

चंदन पावडरमध्ये चिमूटभर हळद मिक्स करा .
तयार पेस्ट चेहऱ्यावर आणि मानेवर १५ ते २० मिनिटांसाठी लावून ठेवा.
पेस्ट सुकल्यावर चेहरा थंड पाण्याने धुवून घ्या.
या फेसकपॅकमुळे टॅनिंगसह चेहऱ्यावरील डेडस्कीन दूर होण्यास मदत मिळेल.

## नारायण... नारायण....

### कोलकाताचा लखनऊवर मोठा विजय, ९८ धावांच्या विजयासह पॉईंट्स टेबलमध्ये अव्वलस्थानी

कोलकाता नाईट रायडर्सने लखनऊच्या घरच्या मैदानावर एलएसजी संघाचा ९८ धावांनी मोठा पराभव केला. केकेआरने दिलेल्या २३६ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना लखनऊचा संघ १५० धावाही करू शकला नाही. लखनऊची फलंदाजी बाजू फेल ठरल्याने संघ १३७ धावांवरच ऑल आऊट झाला. संघाकडून सर्वाधिक ३६ धावांची खेळी मार्कस स्टॉयनिसने केली. त्याच्याव्यतिरिक्त इतर सर्व फलंदाज स्वस्तात बाद झाले. या विजयासह लखनऊ आयपीएल २०२४ च्या पॉइंट्स टेबलमध्ये पहिल्या स्थानी पोहोचला आहे.

२३६ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करण्यासाठी आलेल्या लखनऊ सुपर जायंट्स संघाची सुरुवात खराब झाली. ज्यात २० धावांवर त्यांनी पहिली विकेट अर्शिन कुलकर्णीच्या रूपाने गमवली, जो केवळ ९ धावा करून बाद झाला. यानंतर फलंदाजीला आलेल्या मार्कस स्टॉइनिसने केएल राहुलसह झपाट्याने धावा करायला सुरू केली. दोघांनी मिळून पहिल्या ६ षटकात संघाची धावसंख्या ५५ धावांपर्यंत नेली. ७० धावांवर लखनऊला दुसरा धक्का कर्णधार राहुलच्या (२२)रूपाने बसला. यानंतर संघाने लागोपाठ विकेट गमावल्या.

लखनऊने ६ बाद १०९ धावा केल्या. लखनौचा डाव १३७ धावांवर आटोपून केकेआरने केवळ ९८ धावांनी सामना जिंकला नाही तर प्लेऑफमधील आपले स्थान जवळपास निश्चित केले. केकेआरकडून हर्षित राणा आणि वरुण चक्रवर्तीने प्रत्येकी ३ विकेट घेतले, आंद्रे रसेलने २ विकेट तर मिचेल स्टार्क आणि सुनील नरेन यांनी १-१ विकेट घेण्यात यश मिळवले.

कोलकाताने प्रथम फलंदाजी करताना ६ बाद २३५ धावा केल्या. सलामीवीर सुनील नारायणच्या ८१ धावांच्या खेळीवर मोठ्या धावसंख्येचा पाया रचला. अवघ्या ३९ चेंडूत ६ चौकार आणि ७ षटकारांच्या मदतीने ८१ धावांची शानदार खेळी खेळली. याशिवाय केकेआरसाठी अंगक्रिश रघुवंशीने ३२ धावा केल्या तर शेवटच्या षटकांमध्ये फलंदाजीला आलेल्या रमणदीप सिंगने केवळ ६ चेंडूंचा सामना करत २५ धावांची नाबाद धारदार खेळी खेळून संघाची धावसंख्या २३५ पर्यंत नेण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. लखनऊकडून गोलंदाजीत नवीन उल हकने ३ तर रवी बिश्नोई, युधवीर सिंग चरक आणि यश ठाकूर यांनी प्रत्येकी १ विकेट मिळवली.



### टी २० विश्वकप दरम्यान दहशतवादी हल्ल्याचा धोका

टी२० विश्वचषक स्पर्धेचे सह-यजमान असलेल्या वेस्ट इंडिजला उत्तर पाकिस्तानमधून दहशतवादी हल्ल्याची धमकी मिळाल्याचे वृत्त आहे. दरम्यान, क्रिकेट वेस्ट इंडीजने माहिती दिली की स्पर्धेसाठी सर्व सुरक्षिततेची खबरदारी घेण्यात आली आहे. सुत्रांच्या माहितीनुसार, कॅरिबियन बेटांना उत्तर पाकिस्तानमधून उद्भवणाऱ्या संभाव्य दहशतवादाच्या धोक्यांबाबत सतर्क करण्यात आले आहे.

टी२० विश्वचषक स्पर्धा १ ते २९ जून दरम्यान वेस्ट इंडिज आणि अमेरिकेत होणार आहे. वेस्ट इंडिज अँटिग्वा आणि बार्बुडा, बार्बाडोस, गयाना, सेंट लुसिया, सेंट व्हिन्सेंट, ग्रेनेडाइन्स, त्रिनिदाद आणि टोबॅगो येथे विश्वचषक सामन्यांचे आयोजन करणार आहे. अमेरिकेतील फ्लोरिडा, न्यूयॉर्क आणि टेक्सास या शहरांमध्येही सामने होत असले तरी अमेरिकेतील सामन्यांदरम्यान कोणताही धोका होण्याची चिन्हे नाहीत. दोन उपांत्य फेरीतील सामने त्रिनिदाद आणि गयाना येथे होतील. तर अंतिम सामना बार्बाडोसमध्ये होणार आहे.

एका वृत्तानुसार, प्रो-इस्लामिक स्टेट (IS) ने क्रीडा स्पर्धांदरम्यान हिंसाचार भडकावण्याच्या उद्देशाने कारवाया सुरू केल्या आहेत. ज्यात आयएस- खोरासन (ISAK) च्या अफगाणिस्तान-पाकिस्तानातील शाखेच्या व्हिडिओ संदेशाचा समावेश आहे. त्यामध्ये अनेक देशांमधील हल्ल्यांचा उल्लेख आहे आणि त्यांनी त्यांच्या समर्थकांना युद्धाच्या मैदानात सामील होण्यासाठी आवाहन केले आहे.



## 'अल्याड पल्याड' सिनेमात मकरंद देशपांडे दिसणार वेगळ्या भूमिकेत

मोजक्याच तरीही लक्षवेधी भूमिका करत रंगभूमी आणि रुपेरी पडद्यावर अभिनेता मकरंद देशपांडे यांनी आपल्या अभिनयाचा जबरदस्त ठसा उमटवला आहे. या अवलिया कलाकाराने प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवले आहे, त्यामुळे त्यांच्या नव्या भूमिकेविषयी रसिकांना कायमच उत्सुकता लागून राहिलेली असते.

'अल्याड पल्याड' या आगामी मराठी चित्रपटाच्या निमित्ताने ते तंत्र-मंत्र यात पारंगत असलेल्या एका सिद्धयोगी साधूची भूमिका साकारताना दिसणार आहेत. एस.एम.पी प्रोडक्शन् अंतर्गत 'अल्याड पल्याड' चित्रपट १४ जूनला प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. या चित्रपटाची निर्मिती शैलेश जैन आणि महेश निंबाळकर यांनी केली असून दिग्दर्शन प्रीतम एस के पाटील यांचे आहे.

आपला महाराष्ट्र हा विविधतेने नटलेला आहे. त्यात अनेक जुन्या संस्कृती, तसेच प्रथा, परंपरा आहेत. अशाच एका वेगळ्या परंपरेची आराधना करण्याची प्रथा असणाऱ्या दुर्गम भागातल्या एका गावाची, तिथल्या माणसांची रहस्यमय कथा असलेला 'अल्याड पल्याड' हा थरारपट आहे.

आव्हानात्मक भूमिका करायला मला नेहमीच आवडतात.'अल्याड पल्याड' मधली भूमिका एका मांत्रिकाची आहे, त्याला पूर्ण सिद्धी प्राप्त नाही,त्यातून तो त्या गावाला कसा वाचवणार? याची अतिशय थरार गोष्ट यात मांडलीय. प्रेक्षकांना हा चित्रपट नक्कीच खिळवून ठेवेल यात शंका नाही असं मकरंद देशपांडे सांगतात.

गौरव मोरे, सक्षम कुलकर्णी, सुरेश विश्वकर्मा, भाग्यम जैन, अनुष्का पिंपुटकर आदि कलाकारांच्या भूमिका 'अल्याड पल्याड' चित्रपटात आहेत. कथा प्रीतम एस के पाटील यांची असून पटकथा संवाद संजय नवगिरे यांचे आहेत. छायांकन योगेश कोळी यांचे तर संकलन सौमित्र धरसुलकर यांचे आहे. वेशभूषा अपेक्षा गांधी तर ध्वनी स्वरूप जोशी यांचे आहे. लाईन प्रोड्यूसर दिपक कुदळे पाटील आहेत.

# आधी नुकसान भरपाई, नंतर घरांचा ताबा


## तळोजातील सिडकोच्या लाभार्थींची आर्जवी

पनवेल: सिडको महागृहनिर्माण प्रकल्पातील तळोजा वसाहतीमधील ७ हजारांहून अधिक लाभार्थींना रविवारी सेक्टर ३४ व ३६ येथील प्रकल्प ठिकाणी बैठकीत आक्रमक पवित्रा घेत 'आधी सिडको महामंडळाने नुकसान भरपाई द्यावी, नंतरच आम्ही सदनिकांचा ताबा घेऊ' अशी भूमिका घेतल्याने शेकडो लाभार्थ्यांचे घरांचे स्वप्न अपुर्ण राहण्याच्या वाटेवर आहे. मागील तीन वर्षांपासून सिडको मंडळाने या लाभार्थ्यांना त्यांच्या हक्काच्या सदनिकेचा ताबा वेळीच न दिल्याने या लाभार्थ्यांना गृहकर्जाचे हफ्ते भरावे लागले आणि इतर राहण्याचे घरभाडे भरावे लागले. त्याचीच नुकसान भरपाई हे लाभार्थी मागत आहेत. तळोजातील अपुऱ्या पाणी पुरवठ्याच्या समस्येमुळे सिडको महागृहनिर्माण प्रकल्पातील नवीन सदनिकेत राहण्यासाठी रहिवाशी धास्तावले आहेत. चालण्यासाठी रस्ते, पथदिवे आणि मलनिसारण वाहिनीची कामे पूर्ण करा, त्यानंतरच सदनिकांचा ताबा द्या, अशी भूमिका या लाभार्थ्यांनी घेतली आहे.

नवी मुंबई मेट्रो रेल्वेस्थानकाचे शेवटचा थांबा तळोजा येथील पेणधर मेट्रो स्थानकालगत सेक्टर ३४ व ३६ या परिसरात हा महागृहनिर्माण प्रकल्पाचे काम अंतिम टप्यात सुरु आहे. सिडको महामंडळाने २०१९ मध्ये सोडतीच्या माध्यमातून अल्प व अत्यल्प उत्पन्न गटाचे लाभार्थी निवडले. करोना साथरोगामुळे या प्रकल्पाच्या बांधकामाला मुदतवाढ मिळाली आणि सिडको मंडळाचा लाभार्थ्यांना ताबा देण्याच्या मुदत अनिश्चित राहीली. यापूर्वी सिडको मंडळाने मार्च २०२३ आणि अशा अनेक तारखा सदनिका हस्तांतरणाचे आश्वासन न पाळल्याने हा पेच निर्माण झाला आहे.

या लाभार्थ्यांना लोकसभेच्या निवडणूक आचारसंहितापूर्वी सदनिकांचा ताबा मिळेल अशी अपेक्षा होती. मात्र तसेही झाले नाही. उलट खा. श्रीरंग बारणे यांनी सिडको मंडळाचे तत्कालिन व्यवस्थापकीय संचालकांसोबत घेतलेल्या बैठकीत नुकसान भरपाई देण्याचे मान्य झाले परंतू त्यानंतर व्यवस्थापकीय संचालकांची बदली झाली. नवीन पदभार स्विकारलेल्या व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांनी अद्याप कोणतीही भूमिका या लाभार्थ्यांसाठी न घेतल्याने पुन्हा लाभार्थींच्या शिष्टमंडळांनी खा. बारणे यांची भेट घेतली. परंतू अद्याप त्याचा काही लाभ झाला नाही. रविवारी तळोजातील प्रकल्प ठिकाणी झालेल्या लाभार्थीच्या बैठकीत अनेक महिला लाभार्थ्यांनी त्यांच्या समस्या मांडल्या. या बैठकीमधील उपस्थितांनी सोमवारी सिडको प्रकल्पाबाहेर आधी नुकसान भरपाई सिडको मंडळाने द्यावी, प्रकल्पात राहण्यासाठी मुलभूत गरजा सिडको मंडळाने पुर्ण द्याव्यात त्यानंतर घरांचा ताबा द्यावा अशा आशयाचा फलक झळकवला आहे.

# ऐकून घेऊ सगळ्यांचं... एक मत देऊ जबाबदारीचं...



## असा संदेश देत बचतगटातील महिलांनी केली मतदानाची जनजागृती

ठाणे (गणेश भोईटे) : ऐकून घेऊ सगळ्यांचं... एक मत देऊ जबाबदारीचं... महिला बचतगट हे महिलांचे संघटन आहे. या महिलांचा आपापल्या परिसरात इतर महिलांशी दैनंदिन संपर्क असतो. या संपर्काचा वापर करुन महिला बचत गटांनी महिलांमध्ये मतदानाविषयी जनजागृती कशी करावी व मतदानातील महिलांचा सहभागाचा टक्का कसा वाढवावा या विषयी स्वीप पथकाकडून नुकतेच महिला बचत गटांमध्ये मार्गदर्शन करण्यात आले.




लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ठाणे शहरात २५ ठाणे-लोकसभा मतदार संघांतर्गत १४८ -ठाणे विधानसभा मतदार संघ सहा.निवडणूक निर्णय अधिकारी श्रीमती उर्मिला पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली मतदानाची टक्केवारी व मतदान जनजागृती करण्यासाठी शनिवार,०४ मे २०२४ रोजी महिला बचतगटाच्या माध्यमातून बचतगटातील महिला सदस्यांचा मतदान जनजागृती कार्यक्रम दादा पाटीलवाडी, ठाणे येथे आयोजित केला होता.

सदर मतदान जनजगृती कार्यक्रमात सहभागी असणाऱ्या बचतगटातील महिलावर्गाला मी मतदान करणारंच..... आपण ही आपल्या मतदानासाठी सज्ज रहा.या आशयाचे मजकूर असलेले व त्यावर मतदान दिनांक २० मे २०२४ असे दर्शवणारे माहितीपत्रकाचे ही वाटप करण्यात आले.

मतदानामध्ये सर्वाचा सहभाग आवश्यक आहे. एकही महिला मतदानापासून वंचित राहू नये.शहरातील महिलांना मतदानासाठी सहभागी करून घेण्यामध्ये महिला बचत गटांनी सहभाग द्यावा. बचत गटाच्या माध्यमातून बचत गटाच्या सदस्य, तुमच्या आजूबाजूला राहतात त्या महिला, कटुंबातील सदस्य, नवं मतदार आणि नागरिक यांना मतदान करण्यासाठी प्रवृत्त करावे आणि सर्वानी न चुकता दिनांक २० मे २०२४ रोजी अवश्य मतदान करावे, असे आवाहन सर्व महिलांना करण्यात आले.

दादा पाटीलवाडी परिसरातील ज्येष्ठ नागरिकांना सुलभ मतदानासाठी उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या सुविधांची माहिती देण्यात आली. यावेळी ८२ वर्षीय श्रीमती सिता राऊत यांनी मी २० मे रोजी मतदान करणार आणि इतरांना ही मतदान करायला सांगणार असे नमूद केले. यावेळी सामूहिक मतदानाची प्रतिज्ञा घेण्यात आली.


सदर मतदान जनजागृती कार्यक्रमासाठी प्रतिमा महालक्ष्मी ,इच्छापूर्ती ,वैभवलक्ष्मी,अनमोल आणि नर्मदा या सर्व बचतगतील महिला उपस्थित होत्या त्या सर्व महिलांनी ऐकून घेऊ संगळ्यांच... एक मत देऊ जबाबदारीचं... असा संदेश देत सर्व नागरिकांना २० मे रोजी मतदान करण्याचे आवाहन केले.

# चारित्र्याच्या संशयावरून पत्नीची हत्या

नवी मुंबई : पत्नीचे अन्य व्यक्ती समवेत अनैतिक संबंध असावेत अशा गैरसमजापोटी पत्नीच्या डोक्यात जड वस्तूचा घाव घालून तिला ठार केल्याप्रकरणी नेरुळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर प्रकार घडल्यावर पती फरार झाला होता मात्र त्याला शोधून रविवारी रात्री अटक करण्यात आले आहे. साठ वर्षीय उस्मान सरदार असे यातील आरोपीचे नाव आहे. तो आपल्या परिवारासह दारावे गावातील मारी माता भवन इमारतीत राहतो. त्याच्या पत्नीचे अन्य व्यक्ती समवेत अनैतिक संबंध आहेत असा त्याचा समज होता. यातूनच पती पत्नीचे अनेकदा वाद होत होते. त्यातूनच शनिवारी दुपारी त्यांचे वाद झाले. दुर्दैवाने त्यावेळी घरात कोणी नव्हते. या वादात रागाच्या भरात त्याने पत्नीच्या डोक्यात जड वस्तू घातली. त्या घावामुळे प्रचंड रक्तस्त्राव सुरु झाला. हे लक्षात येताच त्याने पलायन केले. काही वेळाने जेव्हा त्याचा मुलगा घरी आला त्यावेळी आई निपचित पडलेली त्याने पहिली तिला रुग्णालयात नेले असता डॉक्टरांनी तिला मृत घोषित केले. या घटनेविषयी माहिती मिळताच पोलिसही घटनास्थळी दाखल झाले होते. पोलिसांनी घटनास्थळावरून फरशीवर रक्ताचे डाग असलेला कापसाचा बोळा, रक्ताने माखलेली ओढणी, रक्ताने माखलेले दोन चाकू, एक रक्त लागलेला शर्ट जप्त केला आहे. याबाबत त्याचा मुलाने दिलेल्या तक्रारीवरून उस्मान याच्या विरोधात हत्याच गुन्हा नोंद करण्यात आला आहे. घटना घडल्यावर उस्मान पळून गेला होता. त्याचा शोध घेण्यासाठी वरिष्ठ पोलीस निरीक्षक तानाजी भगत यांनी सहाय्यक पोलीस निरीक्षक सागर जाधव यांच्या नेतृत्वाखाली एक पथक उस्मान याचा शोध घेण्यासाठी पाठवले. अनेक ठिकाणी शोधल्या नंतर उस्मानच्या वर्णनाचा व्यक्ती जुईनगर रेल्वे स्टेशन परिसरात असल्याची माहिती मिळताच सागर जाधव यांच्या पथकाने जुईनगर रेल्वे स्टेशन परिसर पिंजून काढत त्याला शोधले. त्याने गुन्ह्याची कबुली दिली असून रविवारी रात्री त्याला अटक करण्यात आले आहे.

ठाणे महापालिकेचा मतदार जागृती उपक्रम

# फ्लॅशमॉबद्वारे तरुणांनी केली मतदान करण्याबद्दल जागृती




ठाणे (मेधा भोईटे) : लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी ठाणे जिल्ह्यात सोमवार, २० मे रोजी मतदान होणार आहे. त्यासाठी मतदारांमध्ये जागृती करण्यासाठी रविवारी सायंकाळी विवियाना मॉल येथे पीडीसी इव्हेंट्स या ग्रुपने फ्लॅशमॉबद्वारे जागृती केली आणि मतदान करण्याबद्दल आवाहन केले.

महापालिका आयुक्त सौरभ राव यांच्या मार्गदर्शनाखाली, मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी ठाणे महापालिकेतर्फे मतदार जागृतीसाठी वेगवेगळे उपक्रम आयोजित केले जात आहेत. त्याच मालिकेत, रविवारी सायंकाळी नागरिकांची मोठी वर्दळ असलेल्या विवियाना मॉलमध्ये मतदार जागृती करण्याची जबाबदारी युवावर्गाने घेतली होती. आम्ही मतदान करणार आहोत, आपणही न विसरता हे राष्ट्रीय कर्तव्य पूर्ण करावे, असे आवाहन या युवांनी नागरिकांना केले. तसेच, फ्लॅशमॉबद्वारे नृत्यातून रसिकांची मनेही जिंकली. लवकरच असा फ्लॅशमॉब कोरम मॉल येथेही करण्यात येणार आहे.

जिल्हा निवडणूक कार्यालयाकडून आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदान प्रक्रियेत मतदारांचा सहभागी वाढविण्यासाठी स्वीप अंतर्गत मतदार जागृतीकरिता विविध उपक्रम राबविले जात आहेत. या पार्श्वभूमीवर ठाणे महापालिकेनेही जाहिराती, बॅनर्स, सोशल मिडिया, आशा सेविका तसेच महापालिकेच्या विविध उपक्रमातंर्गत मतदान जनजागृती करण्यात येत आहे. महापालिकेने मतदान यंत्रांची प्रतिकृती असलेला मॅस्कॉटही तयार केलेला आहे.

# पर्यावरणाचा ऱ्हास करणाऱ्यांवर गुन्हे दाखल

भाईंदर : मिरा-भाईंदर शहरात पर्यावरणाचा र्हास केल्याप्रकरणी मेट्रो ठेकेदार जगदीश कुमार यांच्यासह अन्य तीन जणांवर काशीगाव येथे तीन व भाईंदर येथे एक असे तहसीलदारांच्या आदेशानुसार गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. मिरा- भाईंदर शहराला निसर्गाने लाभलेला सर्व गुण संपन्न वसई व घोडबंदर खाडी किनारा परिसर लाभला आहे. त्यासोबत हिरवळ असलेली मँग्रोव्ह झाडे आहेत.परंतु, त्यांची कत्तल केल्याप्रकरणी तसेच माती डेब्रिज, रॅबिट यांची भरणी केल्याच्या तक्रारी होत्या.त्यानंतर मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशाचा अवमान आणि पर्यावरण संरक्षण कायद्याचे उल्लंघन करून बेकायदा कामे केल्याप्रकरणी जिल्हाधिकारी ठाणे अशोक शिनगारे व अपर तहसीलदार निलेश गौंड यांच्या आदेशान्वये कांदळवन समितीकडून संयुक्त पाहणी करून, पंचनामे करून आणि त्यानुसार गुन्हे दाखल करण्याचे आदेश देण्यात आले. त्यानुसार घोडबंदरचे तलाठी अभिजीत बोडके व भाईंदरच्या तलाठी अनिता पाडवी यांच्या फिर्यादीवरून भाईंदर आणि काशीगाव येथे तीन गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. मेट्रो ठेकेदार जगदीश मदनलाल गुप्ता यांनी चेना येथील सर्व्हे. क्रं. ४/१, ५/२ (२) येथे महापालिकेच्या विनापरवानगी बेकायदेशीररित्या इकोसेन्सेटिव्ह झोन परिसरात नैसर्गिक तलावात भरणी करून बुजवून टाकत त्या ठिकाणी बंगल्याचे बांधकाम केले आहे.

# चिंचपाडा, व्दारली येथील हरितपट्ट्यावरील जीन्सचे ३२ कारखाने जमीनदोस्त

## प्रदुषणाने परिसरातील नागरिक होते त्रस्त

कल्याण : कल्याण पूर्वेतील चिंचपाडा, व्दारली भागातील हरितपट्टा नष्ट करून उभारलेले प्रदुषणकारी जीन्सचे ३२ कारखाने आय प्रभागाच्या साहाय्यक आयुक्त हेमा मुंबरकर यांनी अतिक्रमण नियंत्रण पथकाच्या साहाय्याने शनिवारी भुईसपाट केले. या कारखान्यांमुळे परिसरात जलप्रदूषण, हवेतील प्रदूषण वाढल्याने परिसरातील नागरिक त्रस्त होते. काही वर्षापूर्वी सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशावरून उल्हासनगर शहरातील नागरी वस्तीमधील प्रदुषणकारी जीन्सचे कारखाने हटविण्यात आले. या कारखान्यांमुळे प्रदूषण होत असल्याने परिसरातील नागरिकांनी आपल्या भागात हे कारखाने पुन्हा सुरू होणार नाहीत याची काळजी घेतली होती. अलीकडे काही कारखाना चालक स्थानिकांना हाताशी धरून सरकारी, आरक्षित मोकळ्या, वन जमिनींचा ताबा घेऊन त्यावर शासनाच्या कोणत्याही परवानग्या न घेता जीन्सचे कारखाने सुरू करत आहेत.

*चिंचपाडा, व्दारली भागात काही वर्षापूर्वी हरितपट्टा नष्ट करून ३२ जीन्स कारखाने उभारण्यात आले होते. या कारखान्यांच्या प्रदुषणाने स्थानिक नागरिक खूप त्रस्त होते. या कारखान्यांविषयी तक्रारी वाढल्या होत्या. हे कारखाने बेकायदा असल्याने ते जमीनदोस्त केले. या कारखान्यांना अधिकृत, चोरून वीज मिळणार नाही याची काळजी महावितरणने घेणे गरजेचे आहे.*
*– हेमा मुंबरकर, साहाय्यक आयुक्त, आय प्रभाग, कल्याण.*




कल्याण पूर्वेतील चिंचपाडा, व्दारली भागात काही जीन्स कारखाना चालकांनी या भागातील सरकारी, खासगी जमिनीवरील हरितपट्टा नष्ट करून, या भागातील जैवविविधतेला धोका निर्माण होईल अशा पध्दतीने ३२ जीन्स कारखान्यांची उभारणी केली होती. लोखंडी निवारे, सिमेंट पत्र्यांचे आडोसे तयार करून त्यामध्ये चोरट्या पध्दतीने महावितरणची वीज वाहिनी घेऊन या जिन्स कारखान्यांची यंत्रणा सुरू करण्यात आली होती. या जीन्स कारखान्यांमधून होणाऱ्या प्रदुषणाविषयी आय प्रभाग साहाय्यक आयुक्त हेमा मुंबरकर यांच्याकडे स्थानिक नागरिकांनी तक्रारी केल्या होत्या. या तक्रारीप्रमाणे मुंबरकर यांनी चिंचपाडा, व्दारली येथील जीन्स कारखान्यांची पाहणी केली. या कारखाने चालकांनी शासन, पालिका प्रशासनाची कोणतीही परवानगी घेतली नसल्याचे आणि हे कारखाने बेकायदा असल्याचे निष्पन्न झाले. आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड, परिमंडळ उपायुक्त रमेश मिसाळ यांच्या आदेशावरून पोलीस बंदोबस्तात मानवी आरोग्याला घातक असलेले प्रदुषणकारी ३२ कारखाने आय प्रभागाच्या साहाय्यक आयुक्त मुंबरकर यांनी तोडकाम पथक, जेसीबीच्या साहाय्याने भुईसपाट केले. या कारखान्यांना चालकांनी महावितरणची चोरून वीज घेतली असल्याचे अनेक ठिकाणी तोडकाम पथकाला दिसले. कारवाई पूर्वी वीज पुरवठा खंडित करण्यात आला होता.

कारवाई सुरू होण्यापूर्वीच कारखाने चालक, कामगार घटनास्थळावरून पळून गेले होते. या कारवाईने प्रदुषणाने त्रस्त स्थानिक रहिवासी समाधान व्यक्त करत आहेत.

# स्व. जनार्दन भगतांची पुण्यतिथी

पनवेल : थोर समाजसुधारक स्व. जनार्दन भगत यांच्या पुण्यतिथीनिमित्त मंगळवार दिनांक ०७ मे रोजी सकाळी ०९ वाजता शेलघर येथे भगतसाहेब निवासस्थानी अभिवादन करण्यात येणार आहे.

यावेळी अभिवादन करण्यासाठी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती असणार आहे.

स्व. भगत साहेबांच्या कार्यामुळे सर्वसामान्य माणसाला न्याय मिळाला. शिक्षण, न्याय देण्याचे काम त्यांनी केले. अहोरात्र समाजाची सेवा हाच त्यांचा उद्देश कायम राहिला. ८४ गावांचा न्याय निवाडा करत असताना कोणावरही अन्याय होणार नाही याची त्यांनी सामाजिक भूमिकेतून काळजी घेतली. स्व. जनार्दन भगत साहेबांनी अहोरात्र आपला देह 'बहुजन हिताय, बहुजन सुखाय' या तत्त्वाच्या पूर्ततेसाठी कारणी लावला. तळागाळातल्या लोकांबद्दल त्यांना विशेष प्रेम होते. तळागाळातील समाजाचा उद्धार फक्त शिक्षणामूळेच होऊ शकेल हे त्यांनी जाणले होते. आपली दूरदृष्टी, अविश्रांत श्रम, चिकाटी, धडाडी त्याचबरोबर व्यापक समाजहिताची तळमळ स्व. जनार्दन भगत यांच्या अंत:करणात कायम होती. त्यांच्या पवित्र स्मृतीस अभिवादन करण्यासाठी पदाधिकारी, कार्यकर्ते, ग्रामस्थांनी उपस्थित रहावे, असे आवाहन भगत साहेबांचे पुत्र प्रकाश भगत, अजय भगत व संजय भगत यांनी केले आहे.

# शिळफाटा उड्डाणपूलाच्या उर्वरित तीन मार्गिका वाहतुकीसाठी खुल्या

ठाणे : कल्याण शीळ मार्गावरील शिळफाटा सहा पदरी उड्डाणपुलाच्या उर्वरित तीन मार्गिका नुकत्याच सुरू करण्यात आल्या आहेत. फेब्रुवारी महिन्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत या पुलाची एक बाजू वाहतुकीसाठी खुली करण्यात आली होती. तर नुकतीच या पुलाची दुसरी बाजू देखील वाहतुकीसाठी खुली करण्यात आली आहे. या शिळफाटा सहा पदरी उड्डाणपुलामुळे शिळफाटा चौकातला प्रवास वेगवान झाला आहे. तर कल्याण, डोंबिवली,



अंबरनाथ, बदलापुरातून ठाणे, नवी मुंबईकडे जाणाऱ्या वाहनचालकांना वाहतूक कोंडीतून मोठा दिलासा मिळाला असल्याने वाहनचालकांकडून समाधान व्यक्त केले जात आहे.

कल्याण, डोंबिवली, अंबरनाथ, बदलापूर तसेच आसपासच्या भागांमध्ये राहणाऱ्या नागरिकांना ठाणे, नवी मुंबईला जाण्यासाठी कल्याण शीळ मार्ग हा अत्यंत महत्वाचा मार्ग आहे. या मार्गावरील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी मागील वर्षी या रस्त्याचे सहापदरीकरण करून येथील वाहनचालकांना दिलासा देण्यात आला होता. तर या मार्गावरील प्रवास अधिक वेगवान होण्यासाठी या मार्गावरील पुढील टप्पा असलेल्या मुंब्रा परिसरातील राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४८ वरील शिळफाटा जंक्शन येथे सहा पदरी उड्डाणपुलाची उभारणी करण्यात आली आहे.

खासदार डॉ.श्रीकांत शिंदे यांनी एमएमआरडीच्या माध्यमातून या पुलाची उभारणी केली आहे. या उड्डाणपुलाची तीन मार्गिका असलेली एक बाजू फेब्रुवारी महिन्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी लोकार्पण करून सुरु केली होती. यामुळे पनवेल कडे जाणाऱ्या वाहतूकदारांना मोठा दिलासा मिळाला होता. तर या पुलाची तीन मार्गिका असलेली दुसरी बाजू देखील नुकतीच वाहतुकीसाठी खुली करण्यात आली आहे. यामुळे बदलापूर ते डोंबिवली येथून कल्याण शीळ मार्गे ठाणे आणि नवी मुंबई प्रवास करणाऱ्या वाहनचालकांना वाहतूक कोंडीतून मुक्तता मिळणार असून वेगवान प्रवास करता येणार आहे. यामुळे वाहन चालकांच्या वेळेमध्ये आणि इंधनाचीही बचत होणार आहे.

# शिवसेना ठाकरे गटाकडून पनवेलकरांच्यावतीने पाच प्रश्न

पनवेल : राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची सोमवारी दुपारी साडेतीन वाजता खारघर येथे प्रचारसभा होणार आहे. उपमुख्यमंत्री फडणवीस हे महायुतीचे उमेदवार श्रीरंग बारणे यांच्या प्रचारासाठी खारघर येथे येत आहेत. मात्र फडणवीस यांच्या सभेला काही तास शिल्लक असताना शिवसेना ठाकरे गटाच्या स्थानिक नेत्या लीना गरड यांनी पाच प्रश्नावर उपमुख्यमंत्र्यांनी भूमिका स्पष्ट करण्याचे आव्हान समाजमाध्यमांवर दिल्याने सभेपूर्वीच खारघरमध्ये राजकीय वातावरण तापले आहे. विशेष म्हणजे लोकसभेच्या निवडणुकीच्या प्रचारात पनवेल महापालिका क्षेत्रातील सिडको वसाहतींमधील साडेतीन लाख मालमत्ताधारकांचा दुहेरी कराचा मुद्दा निवडणुकीत सर्वाधिक चर्चेत आला आहे. मावळ लोकसभा मतदारसंघात शिंदे गटाच्या शिवसेनेच्या व महायुतीच्यावतीने श्रीरंग बारणे हे तीसऱ्यांदा निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत. मावळ मतदारसंघात बारणे हे पनवेलकरांना सहज उपलब्ध होत नसल्याची टीका त्यांच्यावर केली जात आहे. मागील अनेक वर्षे संसदरत्न पुरस्कार बारणे यांना मिळाल्याने पुन्हा तीसऱ्यांदा बारणे यांना निवडून देण्याचे आवाहन भाजप व सेनेकडून केले जात आहे. मात्र खारघर वसाहतीमधून मागील महिन्यात ठाकरे गटात प्रवेश केलेल्या माजी नगरसेविका लीना गरड यांनी पाच प्रश्नावर खारघरमध्ये प्रचारासाठी आलेल्या उपमुख्यमंत्री फडणवीस, बारणे यांनी त्यांची भूमिका स्पष्ट करावी असे आवाहन केले आहे.

# जागतिक हास्य दिनानिमित्त विशेष कार्यक्रमात स्वच्छतेचा जागर : मतदानाचेही आवाहन

नवी मुंबई : 'स्वच्छ सर्वेक्षण २०२४' अंतर्गत नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली विविध उपक्रम राबविले जात असून या माध्यमातून लोकांच्या मनात स्वच्छता संदेश रूजविला जात आहे. याकरिता वैशिष्ट्यपूर्ण दिवशी स्वच्छताविषयक नानविध उपक्रम राबविले जात आहे. असाच एक अभिनव उपक्रम जागतिक हास्य दिनाचे औचित्य साधून नवी मुंबई महानगरपालिका आणि सुर्योदय स्मॉल फायनान्स बँक यांच्या संयुक्त विद्यमाने नेरूळ सेक्टर २६ येथील बहुचर्चित ज्वेल ऑफ नवी मुंबई या शहरातील आकर्षणस्थळी सकाळी ७ वाजता अतिरिक्त आयुक्त श्री. सुनिल पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत राबविण्यात आला.

याप्रसंगी स्वच्छ नवी मुंबई मिशनचा युथ आयकॉन विक्रमवीर सागरी जलतरणपटू शुभम वनमाळी, समाजविकास विभागाचे सहा. आयुक्त किसनराव




पलांडे, बेलापूर विभागाचे सहा. आयुक्त तथा विभाग अधिकारी शशिकांत तांडेल, उप पोलीस निरीक्षक विशाल माने तसेच महापालिकेचे स्वच्छता अधिकारी, स्वच्छता निरीक्षक आणि बँकेचे मार्केटिंग टीम प्रतिनिधी शुभम जाधव व अधिकारी, कर्मचारी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आपले नवी मुंबई शहर स्वच्छतेत अग्रणी असून स्वच्छता ही नियमित करण्याची गोष्ट असल्याने प्रत्येक नागरिकाने आपल्या घरातील ओला व सुका कचरा दररोज न चुकता घरातूनच वर्गीकरण करून कचरा गाड्यांमध्येही वेगवेगळा दिला जाईल याची काळजी घ्यावी व यामध्ये खंड पडू देऊ नये असे आवाहन यावेळी अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार यांनी केले. त्याचप्रमाणे प्लास्टिकचे पर्यावरणावर व मानवी जीवनावर होणारे दुष्परिणाम सांगत त्यांनी प्लास्टिक पिशव्या वापरास नागरिकांनी नकार द्यावा व कापडी पिशव्यांचा वापर करावा असे आवाहन केले. यावेळी त्यांच्या व इतर मान्यवरांच्या शुभहस्ते उपस्थितांना कापडी पिशव्यांचे वाटप करण्यात आले.

स्वच्छतेचा युथ आयकॉन जलतरणपटू शुभम वनमाळी यांनीही याप्रसंगी घरातील व परिसरातील स्वच्छतेचे महत्व सांगत यादृष्टीने एक नागरिक म्हणून आपली जबाबदारी मोठी असल्याचे सांगितले. आपण घरातूनच कचरा वेगवेगळा केला तर घनकचरा प्रकल्पस्थळी आपल्या स्वच्छतामित्रांना तो वेगळा करण्यासाठी स्वतंत्र कष्ट करावे लागणार नाहीत याची आपण जाणीव ठेवली पाहिजे असे सांगत शुभम वनमाळी यांनी यादृष्टीने आम्हां युवकांची जबाबदारी मोठी असल्याचे मत मांडले. युवकांनी आपल्या सोसायटी, वसाहतीमध्ये कचरा वर्गीकरणाचे महत्व पटवून देण्यासाठी पुढाकार घेतला पाहिजे असे त्यांनी सांगितले.

यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित नागरिकांनी 'माझी वसुंधरा' अभियानाची सामूहिक शपथ ग्रहण केली. याप्रसंगी घरापासूनच कचरा वर्गीकरण केला पाहीजे हा संदेश ओलू, सुकू आणि घातकू या अनुक्रमे ओला, सुका व घरगुती घातक कचरा यांच्या प्रतिकरूपातील मॅस्कॉटमार्फत अभिनव पध्दतीने पटवून देण्यात आला. या ३ मॅस्कॉटप्रमाणेच सफाईमित्र आणि टॉयलेट वापरा हा संदेश देणाऱ्या एकूण ५ मॅस्कॉट्ससोबत अनेकांनी सेल्फी काढण्याचा आनंद घेतला. जागतिक हास्य दिनाच्या कार्यक्रमाला स्वच्छतेची जोड दिल्याने नियमित स्वच्छता राहिली तर प्रत्येकाच्या चेहऱ्यावर कायम आरोग्यपूर्ण हास्य विलसत राहील हा संदेश या कार्यक्रमाने दिला.

यावेळी २० मे रोजी होणाऱ्या ठाणे लोकसभा निवडणूकीत प्रत्येक नागरिकाने आपला मतदानाचा अधिकार बजावावा असाही संदेश अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार यांनी प्रसारित केला. याठिकाणी मतदार जनजागृतीपर फलक तसेच स्टँडी प्रदर्शित करण्यात आले होते.

'महाराष्ट्र सम्राट' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक चंद्रकांत शंकरराव भोईटे यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँड पब्लिकेशन्स प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट नंबर – डब्लू २३० टी.टी.सी. इंडस्ट्रियल एरिया, कोपर खैरणे, एम.आय.डी.सी., ठाणे बेलापूर रोड, नवी मुंबई – ४००७१० येथे छापून ३०२, हार्मोनी टॉवर, भारत ज्वेलर्स समोर, नेताजी सुभाष चंद्र रोड, कोर्ट नाका, ठाणे पश्चिम – ४००६०१ (महाराष्ट्र ) येथे प्रकाशित केले. संपादक – चंद्रकांत शंकरराव भोईटे ■ RNI - MAHMAR/2012/44140 ■ मो. नं. : +९१-९१६७९५७७७१